# हृदयतरंग

(अन्य रसिक प्रतिक्रियांचा काव्यसंग्रह - भाग ३)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**हृदयतरंग** (अन्य रसिक प्रतिक्रियांचा काव्यसंग्रह - भाग ३)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : ज्येष्ठ शु. द्वितीया, शके १९४७ (स्वतंत्र्यवीर सावरकर जयंती)
बुधवार, दि. २८ मे, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-987974-2-1

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹** २३०/-

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

‘शब्द, भावना आणि संवादाचा अविनाशी प्रवास’

कविता लिहिणं हे माझ्यासाठी केवळ लेखन नाही तर ते माझ्या अस्तित्वाचं, माझ्या श्वासाचं, माझ्या जगण्याचं प्रतीक आहे. शब्द माझ्याकडे कधी येतात, हे मी सांगू शकत नाही; पण जेव्हा येतात, तेव्हा ते माझ्या मनाच्या खोल तळाशी उमटलेल्या भावनांच्या लहरींवरून शांतपणे किनाऱ्यावर येऊन विसावतात.

त्या लहरींचा प्रवासच या पुस्तकांत शब्दबद्ध झाला आहे. ‘बोल बरवा’, ‘रसिकवरा’, ‘अनुबंध’, ‘हृदयतरंग’, ‘प्रतिसाद’ आणि ‘मनस्विनी’. प्रत्येक संग्रह हा माझ्या भावविश्वाचा एक टप्पा आहे; प्रत्येक कविता म्हणजे एका क्षणाचं हृदयस्पर्शी दर्शन.

कविता ही माझ्यासाठी संवाद आहे. स्वतःशी, समाजाशी आणि त्या अदृश्य शक्तीशी जी माणसाला अनुभव देत राहते. या संवादाला जेव्हा रसिकांनी प्रतिसाद दिला, तेव्हा मला जाणवलं, की कविता केवळ एकतर्फी अभिव्यक्ती नाही, ती म्हणजे दोन मनांमधला पूल आहे.

माझ्या कवितांना वाचकांनी जेव्हा शब्दात, भावनेत आणि कधी मौनातही प्रतिसाद दिला, तेव्हा त्या प्रत्येक प्रतिसादाने माझ्या कवितांना नवा अर्थ दिला. त्यांनी त्या कवितांना पूर्णत्व दिलं. या सर्व संग्रहांची कल्पना जन्माला आली ती ह्याच जाणिवेतून, की कविता ही फक्त कवयित्रीची नसते; ती वाचकाच्या हृदयातही पुढे लिहिली जाते. म्हणूनच या पुस्तकात मी माझ्या कवितांसोबत रसिकांच्या त्या अमूल्य प्रतिक्रिया जोडल्या आहेत, ज्यांनी प्रत्येक ओळीला जिवंत केलं, प्रत्येक शब्दाला प्रतिसाद दिला. असं म्हणणं अतिशयोक्ती ठरणार नाही की, ही संकल्पना जगातली पहिलीच अशी आहे, ज्यात कवीच्या कवितेबरोबर वाचकाचे शब्दही त्या कवितेचा भाग बनले आहेत.

माझ्या लेखणीचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, प्रत्येक कवितेखाली मी तिच्या रचनेचा दिनांक आणि वेळ नोंदवते. हे माझं लहानसं; पण अत्यंत हृदयाशी जपलेलं वैशिष्ट्य आहे. कारण माझ्या दृष्टीने कविता म्हणजे भावनेचा जन्मक्षण. तो क्षण पुन्हा कधी येत नाही. त्या क्षणाची वेळ नोंदवणं म्हणजे त्या भावनेला अमरत्व देणं. म्हणूनच माझ्या प्रत्येक कवितेखाली तो क्षण जपलेला आहे. ज्या वेळी माझ्या मनाने त्या शब्दांना जन्म दिला.

अनेकदा लोक विचारतात, 'मंजूषा, तुम्ही कविता कशा लिहिता?' मला त्याचं एकच उत्तर सुचतं. 'कविता मी लिहीत नाही, त्या मला लिहितात.'

त्या माझ्या मनात शांतपणे येतात, कधी रात्र गडद झाल्यावर, कधी एखाद्या ओलसर दुपारी, कधी बालकाच्या हसण्यात, तर कधी माझ्या अंतर्मनाच्या मौनात. त्या माझ्या डोळ्यांनी पाहिलेल्या, पण अनेकांच्या अंतःकरणाने जाणवलेल्या गोष्टींचं प्रतिबिंब आहेत.

या सर्व संग्रहांतून मी जीवनाच्या असंख्य छटा अनुभवल्या. प्रेम, वियोग, नात्यांची गुंफण, स्त्रीमनाचं असंवेदनशीलतेविरुद्धचं बंड, आशेचा किरण आणि माणुसकीचं नितळ सौंदर्य.

'बोल बरवा' मध्ये शब्दांचा नाद आहे, 'रसिकवरा' मध्ये प्रतिसादांचा नवा सूर आहे, 'अनुबंध' मध्ये नात्यांची गुंफण आहे, 'हृदयतरंग' मध्ये भावनांच्या लहरी आहेत, 'प्रतिसाद' मध्ये वाचकांचा श्वास आहे, 'मनस्विनी' मध्ये आत्मविश्वासाची झळाळी आहे आणि 'हृदयस्पर्शी' मध्ये रसिकांच्या हृदयात पोहोचणं आहे.

प्रत्येक पुस्तक माझ्या जीवनाच्या एका टप्प्यावर उमटलेलं मनाचं चित्र आहे. माझ्या लेखनाचा प्रवास सुरुवातीला स्वतःपुरता होता. मला वाटायचं, लिहिलं म्हणजे मन हलकं होतं. पण जसजसा काळ गेला, तसतसं लक्षात आलं की माझ्या या भावनांना कितीतरी रसिक आपल्या भावनांचं प्रतिरूप मानत होते. त्यांच्या प्रतिसादांत मला माझ्याच कवितांचा नवा अर्थ मिळाला.

एखाद्या वाचकाने लिहिलं, 'आपली कविता वाचली की असं वाटतं, आपल्या मनातलं कोणीतरी माझ्यापर्यंत पोहोचवलं.' त्या एका ओळीनं मला वाटलं, की मी लिहिते ते माझं नसून अनेकांच्या मनाचं एकत्रित प्रतिबिंब आहे. ही

जाणीव इतकी खोल गेली, की मी ठरवलं, माझ्या कविता आता फक्त माझ्या राहणार नाहीत, त्या रसिकांच्या प्रतिक्रियांबरोबरच जगणार आहेत. या संकल्पनेतूनच हे सर्व संग्रह जन्मले.

ही केवळ साहित्यनिर्मिती नाही, तर मानवमनांतील संवादाचा प्रयोग आहे. अनेकांना वाटेल, कविता म्हणजे कल्पना; पण माझ्यासाठी कविता म्हणजे अनुभवाचं सत्य. मी जगलेले क्षण, मी पाहिलेलं आकाश, मी अनुभवलं ते प्रेम, मी सोसलेली एकाकी शांतता, हे सगळं त्या शब्दांत विरघळलेलं असतं.

म्हणूनच माझ्या कवितांना कुठेही कृत्रिम झळाळी नाही; त्या साध्या आहेत, पण जिवंत आहेत. माझ्या कवितांमध्ये मी 'मी' लिहिते, पण तो 'मी' अनेकांचा असतो. प्रत्येक वाचकाला त्या ओळीत स्वतः दिसतो. कदाचित हाच माझ्या लेखनाचा सर्वात मोठा पुरस्कार आहे. मी कधीच मोठं लिहायचं ठरवलं नाही, पण मनापासून लिहायचं ठरवलं. त्यामुळेच कदाचित माझ्या कवितांनी काळ आणि पिढ्यांच्या सीमाही ओलांडल्या.

या प्रवासात माझ्या लेखणीला अनेक स्नेही, समीक्षक आणि रसिक भेटले. त्यांच्या प्रतिसादांनी माझ्या कवितांना नवा अर्थ, नवी दिशा दिली. त्यांच्या शब्दांनी मला पुढे लिहायला प्रेरणा दिली. या सर्व रसिकांबद्दल माझ्या मनात अतूट कृतज्ञता आहे. कारण कविता माझी होती, पण तिला जिवंत ठेवणारा श्वास त्यांचा होता.

'कविता लिहिणं म्हणजे स्वतःला ओळखणं,' ही गोष्ट मी या प्रवासातून शिकलो. पण 'कविता शेअर करणं म्हणजे इतरांना ओळखणं,' ही अनुभूती या प्रतिक्रियांमधून मिळाली. माझ्या दृष्टीने वाचक म्हणजे फक्त श्रोता नाही, तो सहनिर्माता आहे. त्याने त्या कवितेला वाचताना स्वतःची छाया दिली, त्याच्या भावनांनी माझ्या शब्दांना अर्थ दिला. म्हणूनच या पुस्तकांमध्ये माझं लेखन आणि त्यांचा अनुभव; दोन्ही एकत्र आले आहे. कविता म्हणजे भावना आणि भावना म्हणजे माणूस. माणसातच माझं विश्व आहे, माणसातच माझ्या कवितांचा धागा आहे.

या पुस्तकांमधून मी प्रयत्न केला आहे की, शब्द आणि भावना यांचं नातं तुटू नये; त्यांचा संवाद सतत सुरू राहावा. मी जेव्हा माझ्या लेखनाच्या मागे वळून पाहते, तेव्हा जाणवतं, की या सर्व संग्रहांमधून मी एकच गोष्ट सांगितली आहे.

‘मनातलं बोलावं, ते शब्दांत उतरावं आणि ते पुन्हा मनापर्यंत पोहोचावं.’ शब्दांचा हा प्रवास कधी थांबलेला नाही, तो प्रत्येक वाचकासोबत नव्यानं सुरू होतो.

म्हणूनच हे ‘मनोगत’ म्हणजे, कवयित्री आणि रसिक यांच्यातील एक निरंतर संवादाची नोंद आहे. या प्रवासाला थांबा नाही; कारण जोवर माणसाचं मन आहे, तोवर कविता राहील आणि जोवर कविता राहील, तोवर हा संवाद अमर राहील.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

हृदयाच्या पृष्ठभागावर लहरी उमटतात; कधी हलक्या, कधी गडद, कधी निःशब्द. कधी त्या लहरींनी संपूर्ण जीवन व्यापून टाकावं असं वाटतं, तर कधी त्या फक्त एका शब्दावर, एका स्मृतीवर थांबतात.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा 'हृदयतरंग' हा असाच एक शब्द-सरोवर आहे. जिथे प्रत्येक कविता म्हणजे मनाच्या एका लहरीचं गीत आहे. त्या लहरींचा सुर, त्यांचा रंग आणि त्यांचा स्पर्श. सर्व काही इतकं आपलंसं वाटतं की आपण वाचक म्हणून नव्हे, तर त्या लहरींचा भाग म्हणून जगू लागतो.

मंजूषाताईंच्या लेखणीचा एक गूढ स्वरूप आहे. त्यांचं लेखन विचारांचं नसतं, ते अनुभवांचं असतं. त्या शब्दांना दिशा देत नाहीत, त्या शब्दांना श्वास देतात. त्या ओळी वाचताना असं वाटतं, की एखाद्या शांत सकाळी, तुळशीपाशी बसून एक मन स्वतःशी बोलतंय.

'हृदयतरंग' हा संग्रह म्हणजे आत्मसंवादाचा आवाज आहे. त्यात ना वाद आहे, ना आवेश; फक्त भावनेचं निर्मळ अस्तित्व आहे. या संग्रहाचं सौंदर्य त्याच्या नादात आहे. प्रत्येक कवितेत एक लय आहे. कधी ती अंतर्मुख, कधी ती निसर्गमय, कधी ती थोडी वेदनादायी. पण सर्वत्र एक मृदुता आहे, एक 'शांत प्रतिध्वनी.' त्या ओळी जशा वाचकाच्या डोळ्यांवरून उतरतात, तशा त्या मनात थरथरतात. जणू तलावाच्या पाण्यावर चंद्राचा प्रकाश पसरावा आणि प्रत्येक लहरीत चंद्राचे अंश चमकावे.

कवयित्रीच्या लेखनाचं एक वैशिष्ट्य, प्रत्येक कवितेखाली त्या रचनेचा दिनांक आणि वेळ नोंदवलेले आहेत. हा केवळ शिस्तीचा भाग नाही, तर क्षणाच्या स्मृतीला अर्पण केलेला नमस्कार आहे. कारण त्या क्षणात उमटलेली

भावना, ती पुन्हा कधी येत नाही. ती वेळ, ते वातावरण, ती मनस्थिती, ही सगळी रसायनं मिळूनच कविता जन्म घेते आणि मंजूषाताई त्या क्षणाला अचूकपणे जतन करतात.

हृदयतरंगातील कविता म्हणजे मनाच्या काठावर येणारे भाव. कधी एखाद्या स्मृतीचा स्पर्श, कधी ओघळलेलं अश्रूविणाचं दुःख, कधी एकटेपणातील शांती, कधी निसर्गाशी गप्पा आणि कधी स्वतःच्या मनाशी केलेला सौम्य तक्रारीचा संवाद. त्या ओळींमध्ये जिथे निःशब्दता आहे, तिथेच सर्वाधिक शब्दांचं वजन आहे.

या संग्रहात स्त्रीमनाच्या अनंत छटा आहेत. ती स्त्री फक्त प्रेम करणारी नाही, ती चिंतन करणारी, जगाचा अनुभव घेणारी आहे. ती वेदनांना गाणं करते आणि आनंदाला शांत स्मित देऊन सोडते. तिच्या कविता म्हणजे एकच गोष्ट सांगतात, की स्त्री ही केवळ भावनिक नाही, ती संवेदनशील विचारवंत आहे.

'हृदयतरंग' हे नाव जसं सुंदर आहे, तसं त्याचं सार अधिक खोल आहे. 'तरंग' म्हणजे अस्थिरता, पण त्याचबरोबर चैतन्य. आणि 'हृदय' म्हणजे स्थिरता, पण त्याचबरोबर स्पंदन. या दोन विरोधी पण पूरक प्रवाहांचा मिलाफ म्हणजेच हा संग्रह. प्रत्येक कविता म्हणजे एक अंतर्मनाचा झरा आहे. त्या झऱ्यातून कधी प्रश्न येतात, कधी उत्तरं उमलतात. कधी शांततेचं पाणी वाहतं, कधी आठवणींचा पूर येतो; पण प्रत्येक ठिकाणी 'स्वत्व' टिकून राहतं कवयित्रीचं आणि वाचकाचंही.

कवयित्रीच्या लेखणीतील निसर्ग हा फक्त पार्श्वभूमी नाही. तो सजीव आहे. पाऊस, झाडं, चांदणं, वारं, फुलं हे सर्व तिच्या भावनांचे रूप घेतात. एखाद्या पावसाच्या थेंबात त्या आठवण शोधतात, एखाद्या वाऱ्याच्या झुळुकीत त्या श्वास ओळखतात आणि एखाद्या पानगळीत त्या स्वतःचं जग बघतात.

या कवितांमध्ये वेळेची जाण तीव्र आहे. कधी एखादी कविता 'रात्री १:४५' ला लिहिली आहे, कधी 'सकाळी ६:१०' ला. ही वेळ सांगते, की भावना नेहमी ठरवून येत नाहीत, त्या मनावर येतात जशा लहरी अचानक, पण अचूक.

हृदयतरंग वाचताना एक सुंदर अनुभव होतो, की आपण शब्द वाचत नाही, आपण मन ऐकतो आणि त्या मनाचा सूर इतका स्पष्ट असतो की आपण त्या लयीत मिसळतो. काही कविता इतक्या संक्षिप्त आहेत, की एकदाच वाचूनही त्या

दीर्घकाळ घुमत राहतात. त्या ओळी नंतर मनात पुन्हा पुन्हा उमटतात. जशा पाण्यात लहरी परत परत उठतात.

मंजूषाताईंची लेखनभाषा सोपी आहे, पण तिच्या सहजतेतच एक प्रगल्भता दडलेली आहे. त्यांच्या शब्दांमध्ये अलंकार नसले तरी लय आहे. भावना आडाख्याशिवाय, पण नादमय रीतीने वाहतात. कविता वाचून वाटतं, की या शब्दांचा जन्म पुस्तकात नाही, तर मनाच्या श्वासात झाला आहे. त्यांच्या लेखनात अंतरंग आणि बाह्य जगाचं नातं दिसतं. त्या स्वतःच्या भावना सांगतात, पण त्याचबरोबर त्या प्रत्येकाची भावना बनतात. हीच खरी कवीत्वाची ओळख आहे. 'मी' लिहिते, पण 'आपण' अनुभवतो.

'हृदयतरंग' या संग्रहात कविता, वेळ आणि मन यांच्या त्रिवेणी संगमाचं दर्शन होतं. जिथे प्रत्येक लहरीवर एक ओळ चमकते आणि त्या ओळीच्या तळाशी एक शांत गूढता दडलेली असते. या कविता वाचताना वाचकाला स्वतःचा प्रतिबिंब दिसतो. कधी ती कविता आपल्याबद्दल बोलते, कधी आपल्या नात्यांबद्दल, कधी आपल्या गप्प, शांत आठवणींबद्दल.

त्या ओळी सांगतात, की भावना ही कमकुवतता नाही; ती म्हणजे मनाचं सजीवत्व आहे.

'हृदयतरंग' हे पुस्तक म्हणजे भावनांचा संथ प्रवाह. ना आरडाओरडा, ना अतिरेक. फक्त शुद्ध, स्वच्छ आणि मनाला स्पर्श करणारा प्रवास. ही कविता म्हणजे शब्दांची शालीनता आणि मनाची प्रगल्भता यांचं मिश्रण.


वाचक हा प्रवास संपवतो, पण अनुभव संपत नाही. शब्दांच्या आणि शांततेच्या सीमेवर जेव्हा मन थांबतं तेव्हाच 'हृदयतरंग' उमटतात आणि तेच तर मंजूषाताईंचं खऱ्या अर्थानं यश आहे.

त्या कविता लिहितातच नाहीत, त्या मनाला हलवतात.

**सौ. सीमंतिनी सुधीर बोर्डे**
संगीत साधिका
छत्रपती संभाजीनगर

# अनुक्रमणिका


१) मायंदळ मायंदळ देऊन जा ... १४
२) एकदा येऊन जा ... १६
३) सांग रे माझ्या मना ... १८
४) तेज दीप उजळले ... २०
५) निजानंदाचे कमळ ... २२
६) कोरं पान ... २४
७) बोकुला छकुला ... २६
८) हृदय हे रंगून जाते ... २८
९) काय दिवस होते भारावलेले ... ३०
१०) जन्म न वाया जावो माणसा ... ३२
११) अक्षय माझे कर्म ठरू दे ... ३४
१२) सुखाचे चांदणे पडता ... ३६
१३) नववधूची मोहिनी ... ३८
१४) प्रिया प्रीतीचे गोड हे भाव ... ४०
१५) किती बुडावे नयनसागरी ... ४२
१६) जीव धन्य होय ... ४४
१७) बंद काळजाची कळी ... ४६
१८) तुझीच संगिनी साथी प्रिया ... ४८
१९) दिव्य गुणांची मोजमिती ... ५०
२०) शापित शशीचे चक्र उदास... ५२
२१) घे नमन हृदयांकिते ... ५४
२२) पुन्हा मीच वेडी नवी जन्मते का ... ५६
२४) किती जगावे कैसे ... ५८
२४) तू सांग कृष्णराजा ... ६०
२५) फुलास प्रीती देती ... ६२
२६) भीज पावसाची ... ६४
२७) आता नव्याने भातुकलीची ... ६६
२८) भरले केळीचे पान ... ६८
२९) मोरपीस ... ७०
३०) चिंब ओल्या वाटेवरती ... ७२
३१) बरवा श्रावण जन्मला ... ७४
३२) भरलेल्या मेघांची तोरणे ... ७६
३३) मंजुवेणु स्वरबंध ... ७८
३४) पार्वतीचा बाळ मी ... ८०
३५) तशीच तुझी नि माझी प्रीती ... ८२
३६) निसर्गातली रम्य दिवाळी... ८४
३७) भाऊबीज ओवाळीते ... ८६
३८) सांगा दिव्यास कोणी ... ८८
३९) जगणे खरे असावे ... ९०
४०) ऐक बा विठ्ठला ... ९२
४१) असे वाटते जन्म वहावा ... ९४
४२) हे वेडाचे वेडूऽऽ कोडे ... ९६
४३) वळण असावे वळणावळणावरती ... ९८
४४) नखशिखांत साजामध्ये ... १००
४५) बीज अंकुरे अंकुरे ... १०२
४६) प्रिया वधू मी सख्या तुझी रे ... १०४
४७) जळ अवखळ लाटांच्या नागिणी ... १०६



## (१)
## मायंदळ मायंदळ देऊन जा

मायंदळ मायंदळ देऊन जा
झोळी फाटकी घेऊन जा
जरा जरासे मला सख्या रे
तुझ्या कृपेने पाहून जा
मायंदळ मायंदळ देऊन जा...

मनात ठेवीन सुगंध सारा
गाभाऱ्यात त्या राहून जा
भावभक्तीची फुले उमलली
मायंदळ मायंदळ हुंगून जा

तुझ्या भेटीची आस जीवाला
जन्म सांगतो न्हाऊन जा
कणाकणातून तोच राहतो
मायंदळ मायंदळ घेऊन जा

कर्म आधीचे गतजन्मीचे
संचितातले भोगून जा
भजन तयाचे जपता जपता
मायंदळ मायंदळ गाऊन जा

उघड्या नयनी सृष्टी सारी
कर्तुत ते स्वीकारून जा
मिटता डोळे रूप तयाचे
मायंदळ मायंदळ पाहून जा
मायंदळ मायंदळ पाहून जा

दि.२५/०४/२०२४
सकाळी ०९.३२ वा.


10:33
ACP-100
Charulata Kale Parle Mumbai,avinash Dh...
भजन तयाचे जपता जपता
मायंदळ मायंदळ गाऊन जा

उघड्या नयनी सृष्टी सारी
कर्तुत ते स्वीकारून जा
मिटता डोळे रूप तयाचे
मायंदळ मायंदळ पाहून जा
मायंदळ मायंदळ पाहून जा

रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२५/०४/२०२४
सकाळी ०९.३२ वा.
10:22
~ Satish Thanekar
+91 98692 67693
You
मायंदळ मायंदळ देऊन जा
मायंदळ मायंदळ देऊन जा...
फारच छान कविता

**मायंदळ** शब्द खूप दिवसांनी वाचण्यात आला, हरवलेला शब्द गावसल्यासारखा वाटला
10:28
होय,ह
किती गोड शब्द आहेत माय मराठीचे
10:33
Message



ही नजर माझी कुणाला
पाहते ना सांगते
शून्य तेथे शून्य येथे
का जीवाला टांगते

अंगठी बोटात राहे
मूक जैसी भावना
तीही आता आस सोडून
भांडते माझ्या मना

या जळाच्या उठती उर्मी
प्रश्न अगणित थांबले
का दिशा झाल्या निरुत्तर
वागणे का हे चांगले


सांगते मी ऐक जमले
तर तुला रे एकदा
वेड माझे ओळखून घे
भेटुनी जा एकदा

दि.२६/०४/२०२४
सकाळी ०७.१४ वा.

## (२)
## एकदा येऊन जा

एकदा येऊन जा रे
पाहण्या मन एकटे
का उगा वाटे उदासी
ही भकासी भेटते
एकदा येऊन जा

केस माझे गुंतलेले
झाले वेडे मोकळे
ते तरी निर्जीव वाटती
ओके बोके ओकळे


07:44
Anirudhha Kulkarni
online
अंगठी बोटात राहे
मूक जैसी भावना
तीही आता आस सोडून
भांडते माझ्या मना
या जळाच्या उठती उर्मी
प्रश्न अगणित थांबले
का दिशा झाल्या निरुत्तर
वागणे का हे चांगले
सांगते मी ऐक जमले
तर तुला रे एकदा
वेड माझे ओळखून घे
भेटुनी जा एकदा
रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२६/०४/२०२४
सकाळी ०७.१४ वा.
07:18
एकदम छान विरहगीत 👌👌
विविध पद्धतीने प्रकटलेली आर्तता
पिळवटून टाकणारी आहे...
मस्तच मंजू!! 👌👌
Edited 07:38
Message



**(३)**

**सांग रे माझ्या मना**

का उगा बघतोस इतके
नजरेतुनी का खोडी ती
उडवुनी देतो बटांना
पवन अवखळ गोडी ती


चालतो माझा प्रवास नि
तू प्रवासी वेगळा
रोज रोजची थांबसी अन
नाद वेड्या आगळा

राग मानू मी कसा तू
भाव अनुरागी जसा
बोलक्या त्या कामना नि
तू विरागी रे कसा

वाचशील वाटे कधी तू
मानसीच्या कल्पना
ओठ माझे बंद जरीही
नयन करती जल्पना

थांब थोडे मिटून डोळे
वाढती ठोके पुन्हा
भाळसी का रोज त्यावर
सांग रे माझ्या मना


दि.२६/०४/२०२४
सकाळी ०८.३९ वा.


08:12
ACP-100
Charulata Kale Parle Mumbai,avinash Dh...
भाव अनुरागी जसा
बोलक्या त्या कामना नि
तू विरागी रे कसा

वाचशील वाटे कधी तू
मानसीच्या कल्पना
ओठ माझे बंद जरीही
नयन करती जल्पना

थांब थोडे मिटून डोळे
वाढती ठोके पुन्हा
भाळसी का रोज त्यावर
सांग रे माझ्या मना

रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२६/०४/२०२४
सकाळी ०८.३९ वा.
07:44
~ Satish Thanekar
+91 98692 67693
You
सांग रे माझ्या मना
का उगा बघतोस इतके...
कवितेच्या शब्द रचनेवर भाळावं अशी कविता
08:10
Message




## (४)
## तेज दीप उजळले

नीज डोळ्यात उरली निशा गुंगून सरली
पहाटेला प्राचीवर तेजशलाका फिरली

अरुणोदयाच्या सवे रवीराज उगवला
झणी आसमंत त्याने सोत्साहाने जागविला

वारा घुमड घुमड सूर घुमवीत आला
फांदी फांदीवर खग मेळा गलबला झाला

पूजा राऊळी मांडली ईश आराधना चाले
समईच्या ज्योतीतले तेज दीप उजळले

रूप ओंकारस्वरूप त्याचे अनादी अनंत
त्याचा नाद ओंकाराचा घुमतो पहा दिगंत

रोज सकाळ सकाळी अशी गाभाऱ्यात यावी
मन उजळून जाता नव्या नवती पहावी

दि.२९/०४/२०२४
सकाळी १०.२२ वा.


21:21
*प्रतिभा आणि प्रतिमा*
Rajeshwari Ambikepune प्र प्र, +91 77748...
----------------------
आहे शब्दात शक्ती
प्रकट भावना करण्याची
जुळून येती भावपंक्ती
फुलते प्रिती मनामनाची
मीना दामोदर कुलकर्णी.
17:27
11 Unread Messages
~ Milind G. Kulkarni +91 98676 51242
You
तेज दीप उजळले
नीज डोळ्यात उरली निशा गुंगून सरली...
वाहवा.
"रुप ॐकारस्वरूप त्याचे अनादी अनंत
त्याचा नाद, ॐकाराचा, घुमतो पहा
दिगंत."
फार सुंदर कडवे.
नासालासुध्दा सुर्याचा वेध घेताना ॐकार
गवसला आहे. आपल्याला आधीच
माहित होते, इतकंच.
17:42
~ Meena Kulkarni +91 99671 25816
Message



## (५)
## निजानंदाचे कमळ

निजानंदाचे कमळ फुलू दे
समाधान सरोवरी
आत्मानंद हृदयमन्दिरी
स्वर्ग विलसे भूवरी


एक एक पाकळी उमलू दे
दुःख पंक तुडवुनी
परमानंद हा सतत लाभू दे
कोशवृत्ती उडवुनी

अशी उगवता सकाळ प्राची
उजळून दाही दिशा
तेज पसरू दे तमा विसरू दे
जागताना ती जिगीषा

जळ संसारी लाटा कहारी
झोक न जाणे बरे
अहंकाराचा वारा न उपटो
मूळ विसरणे न खरे

जसे हे फुलणे जीवा जीवाचे
तसेच मिटणे आहे
जीवा शिवाचे परम एकदा
मुक्त भेटणे पाहे

दि.३०/०४/२०२४
रात्री ०८.०३ वा.


09:07
Vc Agrawal Uttarakh...
अशी उगवता सकाळ प्राची
उजळून दाही दिशा
तेज पसरू दे तमा विसरू दे
जागताना ती जिगीषा

जळ संसारी लाटा कहारी
झोक न जाणे बरे
अहंकाराचा वारा न उपटो
मूळ विसरणे न खरे

जसे हे फुलणे जीवा जीवाचे
तसेच मिटणे आहे
जीवा शिवाचे परम एकदा
मुक्त भेटणे पाहे

रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.३०/०४/२०२४
रात्री ०८.०३ वा.
07:53
अध्यात्म का हृदय स्पर्शी चिंतन बहुत बहुत अभिनंदन वन्दन।
09:03
09:07
Message

## (६)
## कोरं पान

छान छान असो की
नावडते जगणे मग
आपले आपल्याला
नव्याने कोरे करता यावे जग


पुसता यावे ओरखडे
ओरबाडे मनावरचे
एक खोडरबर आपल्याजवळ
गुपचूप क्षणावरचे

क्षण हवे ते क्षण नको ते
जर का मांडता आले
दुःख सारे साचलेले
मुक्तपणे सांडता आले

मन असं मोकळं करत
दडपणाविना जगता येईल
मनालाच हवं ते
मोकळेपणे मागता येईल

रोज नव्यानं जगण्यासाठी
जीवनाचं रोज कोरं पान
कितीदा नव्याने लिहीत जावे
आयुष्याला आपल्या छान

दि.०२/०४/२०२४
रात्री ११.४९ वा.


08:39
Stay Connected HBD Dhon...
+91 90280 17745, +91 90290 30818, +9...
मन असं मोकळं करत
दडपणाविना जगता येईल
मनालाच हवं ते
मोकळेपणे मागता येईल
रोज नव्यानं जगण्यासाठी
जीवनाचं रोज कोरं पान
कितीदा नव्याने लिहीत जावे
आयुष्याला आपल्या छान
रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.०२/०४/२०२४
रात्री ११.४९ वा.
07:56
Prakash Kulkarni Stay Connecte...
You
कोरं पान
छान छान असो की...
अप्रतीम.. By all measures..
A perfect अक्षर creation.. !!
छंदामध्ये अडकला नाहीत हे खूप छान
वाटले.. मुक्त सौन्दर्य शाश्वत आशय
08:00
Message



## (७)
## बोकुला छकुला

का ग आई, का ग आई
सांग ना मला काही
सारखे  मी विचारतो
तुला किती प्रश्न बाई

आपण उंदीर का पकडायचे
त्यांच्या मागे किती धावायचे
डोळे  मिटुनच दूध का प्यायचे
उडी मारता पायावरच का यायचे

आपणही खायला
ताट का नाही घेत
पाहुण्यांना आपल्या
हॉटेलात का नाही नेत

नवे नवे कपडे, चपला गॉगल
फिरायला गाडी का ग नसावी
आपल्याही घरात टी व्ही नि मोबाईल
दुधाची डेयरी मस्त असावी


काय बाबा सांगू मी
किती तुझे प्रश्न
सुचतच नाही काही
निरुत्तर प्रश्न


भंडावून सोडतो हा
बोकुला छकुला
डोळे त्याचे खोडकर
सारखेच विचारती काहीतरी मला

कान बघा कसे हो
टवकारलेले
डोळे ते घारुळे
वटारलेले

आता काय बोलू मी
बघतोय कसा
सासराच जाब मला
विचारतो जसा

दि.०३/०४/२०२४
रात्री ११.०१ वा.


00:47
Sonu Maushi
भंडावून सोडतो हा
बोकुला छकुला
डोळे त्याचे खोडकर
सारखेच विचारती काहीतरी मला
कान बघा कसे हो
टवकारलेले
डोळे ते घारुळे
वटारलेले
आता काय बोलू मी
बघतोय कसा
जणु सासराच जाब
विचारतो जसा
रचना© डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.०३/०४/२०२४
रात्री ११.०१ वा.
23:05
Today
अगं किती किती छान लिहिलेस ग
00:31
Message


13:14
Stay Connected HBD Dhon...
+91 90280 17745, +91 90290 30818, +9...
6.5 MB
KMC
11:36
1 Unread Message
Jayant Kanade Stay Connected
You
बोकुला छकुला
का ग आई,का ग आई...
अतिशय सुंदर.
पाडगावकरांची आता खेळा नाचा किंवा
बोल गाणी कवितांसारखी जमलीय.
13:03
Message



## (८)
## हृदय हे रंगून जाते

तूही पडला न प्रेमात यांच्या
फुले चिमुकली गोड
रंग एवढे कोण टाकतो
आकारही अजोड


निसर्ग असतो खरा सोबती
सखा आपुला हितकर
मोहक दृश्ये किती साठवून
घ्यावी मनातच सुंदर

स्पर्श कोवळे हरितृणांचे
मल्मल फुलात दडते
मऊशार ही वाटे पालवी
किमया सदैव घडते

असो उदासी अथवा भकासी
क्षणात संपून जाते
नव्या नव्याशा स्वप्नफुलांवर
हृदय हे रंगून जाते

विसरून आपुले आपुलेपण मग
इथे रमावे वाटे
फुले पाकळ्या रंग खुलुनीया
मनी खुशी ही दाटे

दि.०६/०५/२०२४
सकाळी ०९.३७ वा.


07:50
Sanjivani Gole Dombi...
किमया सदैव घडते
असो उदासी अथवा भकासी
क्षणात संपून जाते
नव्या नव्याशा स्वप्नफुलांवर
हृदय हे रंगून जाते
विसरून आपुले आपुलेपण मग
इथे रमावे वाटे
फुले पाकळ्या रंग खुलुनीया
मनी खुशी ही दाटे
रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.०६/०५/२०२४
सकाळी ०९.३७ वा.
21:01
Today
मोहक दृश्य आहे. कविता सुंदर.
तुमच्या कवितेनेही मरगळ संपून ताजेतवाने वाटते.
06:26
07:41
Message



## (९)
## काय दिवस होते भारावलेले

सारवण शेणाचं तुझं
अंगणी चालायचं
कधी सडा पडायचा
कधी लिंपण घराचं व्हायचं

तू लक्ष्मी घराची
घरावरून तुझा हात फिरायचा
सुगंध मातीचा हुंगून
आसमंतात तो किती उरायचा

संपदा प्रेमाने नित्य
गोधनाची गोठ्यात वसे
आला गेला पै पाहुणा
सुखाने तृप्त होतसे


घराची कळा अंगण सांगते
म्हणत असत पूर्वज सगळे
तू अंगणाला तुझ्या प्रेमाने
बनवत असशी देखणे नि आगळे

इथेच कितीतरी दुःख
बरे झाले भुई लोण लावून
इथेच मनाच्या वेदना
संपून गेल्या मनमोकळ्या गप्पांतून

हे शेणाचे सडे, हे सारवण
हे लिंपण चुलीचं, भिंतींचं लेपण
काय दिवस होते भारावलेले
खेड्यातले आपुलकीचे ते पण

दि.०८/०५/२०२४
सकाळी ०७.४७ वा.


08:15
नभरंग कलेचे व्यासपीठ
+91 77220 06924, +91 84110 38484, +9...
~ Sharad Joshi
+91 87667 85913
You
जन्म न वाया जावो माणसा
कुणी शिकवले तुला हे असले...
खूप सुंदर रचना ! 👌 👌 🙏 🙏
07:04
You
काय दिवस होते भारावलेले
सारवण शेणाचं तुझं...
खूप छान ! 👌 👌 मी तुमच्या कविता,काव्यरचना बर्याच दिवसांपासून वाचतो.खूप छान असतात. अगदी सुरवातीपासून केलेल्या कवितांचा संग्रह केला आहे का ? करून ठेवावा अशी ईच्छा आहे. सादर प्रणाम !! 🙏 🙏
07:11
हो सर,सर्वप्रथम तर आपले खूप मनापासून आभार मानते.आपल्यासारखे रसिकवर हीच माझी खरी संपदा आहे.
अगदी सुरुवातीपासूनच्या कवितांचे संग्रह करणे सुरू आहे.
अशाच सदिच्छा पाठीशी असू देत 🙏
08:15
Message



## (१०)
## जन्म न वाया जावो माणसा

कुणी शिकवले तुला हे असले
रसग्रहणाचे धडे
फूलपाखरा फुलाभोवती
मधु मधुराचे कडे

कुठे उमलली फुले हासरी
कसे जाणवते तुजला
गोल इवलुसे डोळे तरीही
बाग खुणावते तुजला

फुलाफुलांच्या परागातुनी
मधुघट भरले कुणी
तुला नेमके अमृत तेथे
हे सांगितले कुणी

जीव इवलुसा उदर छोटुले
भूक लहानशी असता
कसे प्राशिसी सांगायाला
कुणीही जवळी नसता

इकडून तिकडे तिकडून इकडे
रस अमूल्य ते भरीशी
उडता उडता सुंदर जगणे
सुंदरतेने करीशी

पंखांवरती चित्र रंगीले
जरी कोरले आहे
वरवरच्या त्या मोहामध्ये
फुलपाखरू अडके न पाहे

काय हो मौलिक घ्यावे झटपट
शिकणे त्याच्याकडुनी
जन्म न वाया जावो माणसा
व्यर्थासाठी अडुनी

दि.०७/०५/२०२४
सकाळी ०८.२६ वा.


08:15
नभरंग कलेचे व्यासपीठ
+91 77220 06924, +91 84110 38484, +9...
~ Sharad Joshi +91 87667 85913
You
जन्म न वाया जावो माणसा
कुणी शिकवले तुला हे असले...
खूप सुंदर रचना ! 👌👌🙏🙏
07:04
You
काय दिवस होते भारावलेले
सारवण शेणाचं तुझं...
खूप छान !👌👌 मी तुमच्या कविता,काव्यरचना बर्याच दिवसांपासून वाचतो.खूप छान असतात. अगदी सुरवातीपासून केलेल्या कवितांचा संग्रह केला आहे का ? करून ठेवावा अशी ईच्छा आहे. सादर प्रणाम !! 🙏🙏
07:11
हो सर,सर्वप्रथम तर आपले खूप मनापासून आभार मानते.आपल्यासारखे रसिकवर हीच माझी खरी संपदा आहे.
अगदी सुरुवातीपासूनच्या कवितांचे संग्रह करणे सुरू आहे.
अशाच सदिच्छा पाठीशी असू देत🙏
08:15
Message



## (११)
## अक्षय माझे कर्म ठरू दे

अक्षय माझी शब्दसंपदा
अक्षय त्यातील भाव राहू दे
अक्षय वाणी सहजी प्रसृत
अक्षय माधुरी त्यात वाहू दे

अक्षय माया अक्षय प्रीती
अक्षय असू दे लोभस नाती
अक्षय नंदादीपामधली
तेवत राहो प्रकाश ज्योती


अक्षय इथल्या भाव भावना
अक्षय आणिक हळव्या कामना
अक्षय ऋजुता बंध कोवळे
अक्षय सालस ठेव या मना

अक्षय सेवा तुझी साधना
अक्षय असू दे आराधना
अक्षय सर्जन अक्षय अर्जन
अक्षय तृप्ती असो मन्मना

अक्षय मधुरस अन्नकणांचे
अक्षय नवरस साहित्याचे
अक्षय लाभो रसिकवरांचे
अक्षय आशीष मान्यवरांचे

अक्षय मजला कृपा तुझी अन
अक्षय शिरी ह्या कर तू ठेवून
अक्षय माझे कर्म ठरू दे
अक्षय अक्षरसेवा होऊन

दि.१०/०५/२०२४
सकाळी ०८.०५ वा.
अक्षयतृतीया शुभकामना


13:37
Stay Connected HBD Amit...
+91 90280 17745, +91 90290 30818, +9...
जळगांव जिल्ह्यातील भादली या रेल्वेस्टेशनवर हा अपघात घडला. किती जणांना ... Read more
11:32
~ Ajit Muthe
+91 94206 10003
~ A
+91 99307 46999
बालकवी:
५ मे १९१८ ची गोष्ट आहे. अठ्ठावीस वर्षे वयाचा एक ...
मुळचे धरणगाव(जि.जळगाव) येथिल बालकवींचे स्मारक व्हावे म्हणून धरणगाव येथिल विविध संघटना कित्येक वर्षापासून प्रयत्न करत आहेत मात्र आजपर्यंत स्मारक झालेले नाही ही खेदाची बाब आहे.😨
11:37
1 Unread Message
Geeta Kulkarni,stay Connected G...
You
अक्षय माझे कर्म ठरू दे
अक्षय माझी शब्दसंपदा...
फार सुंदर कविता.👌 👌 त्यातील प्रत्येक ओळ अप्रतिम. 👍
13:32
Message



## (१२)
## सुखाचे चांदणे पडता

सुखाचे चांदणे पडता
मनाला येते का भरती
फळावी आस आसुसली
चकोराची जशी रीती


कळावे त्याचसाठी ही
प्रतीक्षा जन्मोजन्माची
नसावे दुःख का वाटे
जगाया जळमटे त्याची

अमावस दूर सारूनी
कलेने वाढणे होते
ऱ्हासाच्या राती पचवाव्या
पुनव मग अलगदशी येते

दुःख हे ना ठरते कधीही
सुखाचे क्षणही ना उरती
हवे जे वाटते मनुजा
जपाया दो क्षणही पुरती

सुखाचे चांदणे यावे
कुट्ट अंधार असताना
सुखे ही आपसूक पावावी
मनी ध्यानीही नसताना

दि.१५/०५/२०२४
सायंकाळी ०७.१७ वा.


09:41
ACP-100
Charulata Kale Parle Mumbai,avinash Dh...
रंग येतील नवनवे ते
रोज आता जीवनी
नवरोबाच्या मानसीला
नववधूची मोहिनी


रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.१६/०५/२०२४
सकाळी ०८.१८ वा.
08:25
Dr. Laxmikant Dani Acp100 दे ब्रा
You
सुखाचे चांदणे पडता
सुखाचे चांदणे पडता...
काय सुंदर काव्य रचना डॉ. मंजुषा ताई.
You have great potential for creative, innovative thoughts, ideas, concepts etc.
You are simply Great Dr. Manjusha. We are so proud of you.
08:48
Avinash Dharmadhikari Police,L...
Forwarded
Message




## (१३)
## नववधूची मोहिनी

सोन हळदीने माखलेली
ही बहाव्याची नवरी
पाहुनी भवताली दिसते
का अशी ती बावरी

रंग कोणी सांडला हा
स्वर्णकांती मोहना
लुभवितो स्वप्नांसवे
का बहावीच्या मना








अंग अंगांवरती पसरे
वर्ख सोन्याचा जसा
अन मुलामा कोणी दिधला
नव सुखाचा हा असा

हासते ती हासते का
मुरक्या मुरक्या लाजते
प्रीत साम्राज्यात नवखी
प्रेम कहाणी गाजते

रंग येतील नवनवे ते
रोज आता जीवनी
नवरोबाच्या मानसीला
नववधूची मोहिनी

दि.१६/०५/२०२४
सकाळी ०८.१८ वा.





## (१४)
## प्रिया प्रीतीचे गोड हे भाव

पसरून गेली सभोवताली
सहवासाची मधुर गंधाली
पानापानामधून वाहते
कुंद हवा प्रीतीची धुंदाली


धूसर धूसर जग हे वाटते
जीवन नवेच नवे भेटते
तुझ्यासवे आशेची किरणे
अंधाराचे जाळे फिटते

झाडावेलींवरली पालवी
फुलाफुलांना जणू खेळवी
नवाच वारा नव्याच बहरा
मधुमासाला हृदयी वळवी

इथेच हातामधले हात
बसलो थोडे निवांत गात
स्वर गुंजन गुंजत असताना
लवथवते गवताची पात

किती स्मरावे क्षण दोघांचे
वसले आपुले इथेच गाव
कायम राहतील काळजात या
प्रिया प्रीतीचे गोड हे भाव
प्रिया प्रीतीचे गोड हे भाव

दि.२०/०५/२०२४
सकाळी ०७.३९


14:05
Vc Agrawal Uttarakh...
online
झाडावेलींवरली पालवी
फुलाफुलांना जणू खेळवी
नवाच वारा नव्याच बहरा
मधुमासाला हृदयी वळवी
इथेच हातामधले हात
बसलो थोडे निवांत गात
स्वर गुंजन गुंजत असताना
लवथवते गवताची पात
किती स्मरावे क्षण दोघांचे
वसले आपुले इथेच गाव
कायम राहतील काळजात या
प्रिया प्रीतीचे गोड हे भाव
प्रिया प्रीतीचे गोड हे भाव
रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२०/०५/२०२४
सकाळी ०७.३९
09:31
1 Unread Message
आपके प्यार भरे मधुर गीत भावुक कर देते हैं। सचमुच आप प्रेम और सौन्दर्य की प्रतिमूर्ति हैं। बहुत बहुत शुभकामनाएं।
13:57
Message



## (१५)
## किती बुडावे नयनसागरी

किती बुडावे नयनसागरी
पुन्हा डुबावे वाटे
अगणित लाटा उसळून येती
मदन पूर जणु दाटे

त्या बुबुळांच्या चंचल पक्षिणी
भिरभिर भिरभिरताना
त्यावर मिचमिच झाक पापण्या
काळजास चिरताना


कशास कज्जल धार लाविली
नजरेला बांधाया
नको बघू तू रोखून ऐसे
धागे पुन्हा सांधाया

मी मरतो रोजच आणिक जगतो
याच लोचनांवरती
किती जुल्मी हे चक्षु खोडीले
अपराध हवेसे करती

हात तुझा मग हाती येता
श्रीकर भासून जातो
तुझ्या रूपाने येई संपदा
सुख वारा हासून गातो

कधी न विसरतो दृष्टी तुझी ही
रोज मला हेरणारी
तू अशी कमलिनी मधुकरास ही
मदनजाले घेरणारी

दि.२१/०५/२०२४
सायं. ०६.४३ वा.


21:48
Dr. vijaya Wad Nishig...
online
नको बघू तू रोखून ऐसे
धागे पुन्हा सांधाया

मी मरतो रोजच आणिक जगतो
याच लोचनांवरती
किती जुल्मी हे चक्षु खोडीले
अपराध हवेसे करती

हात तुझा मग हाती येता
श्रीकर भासून जातो
तुझ्या रूपाने येई संपदा
सुख वारा हासून गातो

कधी न विसरतो दृष्टी तुझी ही
रोज मला हेरणारी
तू अशी कमलिनी मधुकरास ही
मदनजाले घेरणारी

रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२१/०५/२०२४
सायं ०६.४३ वा.
18:52
Kiti g chaan kavita Manju!
Abhinandan
21:46
धन्यवाद माझी माय
21:48
Message



## (१६)
## जीव धन्य होय

झेप गरुडाची माझ्या
आज हाती आली
पंख ल्येत कल्पनेचे
मूर्त साकारली

लालबुंद मिरच्यांच्या
तजेल्या रंगात
संचारली आग
वैनतेयाच्या अंगात

ताज्या ताज्या मिरचीचे
देहरूप आले
चोच डोळे शेपूटही
हुबेहूब झाले


उंच आकाशात त्याची
झेप नि भरारी
तीच साकारली म्या की
नजर करारी

सारवल्या भुईचेच
नभ त्यास दिले
आकांक्षांचे पंख होत
रूप ठरविले

मनामंदी भक्ती तुझी
कला तूच दिली
पूजा तुझी अशी बघ
न्यारी म्या बांधली

केली देवा नारायणा
वाहनाची सोय
आता तुझं रूप दाव
जीव धन्य होय
माझा जीव धन्य होय

दि.२३/०५/२०२४
सकाळी ०६.५४ वा.


23:44
नभरंग कलेचे व्यासपीठ
+91 77220 06924, +91 84110 38484, +9...
19:25
Your security code with +91 89758 80021 changed. Tap to learn more.
3 Unread Messages
~ Purushottam Ing... +91 98506 64393
~ Purushott... +91 98506 64393
Photo
दुर्दैव त्या कविचे
ज्याची दखल नाही
जाऊ दे....
इथे आपले ...
कुणीच नाही....
पु.ना.इंगळे
कोथरूड पुणे
23:15
You
जीव धन्य होय
झेप गरुडाची माझ्या...
डॉ.आपण खरचं छान लिहीता.
आपण न थकता....स्वत:साठी लिहीता.
म्हणून तुमची प्रत्येक कविता श्रेष्ठ आहे.
असो....लिहित राहाल ना!!
23:18
Message



## (१७)
## बंद काळजाची कळी

हिरव्या अळूच्या पानावर
थेंब पाण्याचे जे चार
दव मोत्यांची शोभा ही
स्पर्श दिलाश्याचे गार


रेषा पानाच्या खुलती
पाने वाऱ्याशी डोलती
सृष्टीमध्ये शब्देविन
सारे सारेच बोलती

रंग उमलून येती
ऋतुभराला लेऊन
कळ्या हसतात तेव्हा
गोड फुले ती होऊन

गूज त्यांचेच चालते
एकमेकांशी प्रेमाने
पानं फुलं झुलतात
धुंद हवेशी जोमाने

वाटे दव मी की व्हावे
कधी कलिका फुलेही
बंद काळजाची कळी
अलगदसी खुलेही

दि.२४/०५/२०२४
रात्री १०.२२ वा.


11:56
Vijay randive sir
रंग उमलून येती
ऋतुभराला लेऊन
कळ्या हसतात तेव्हा
गोड फुले ती होऊन
गूज त्यांचेच चालते
एकमेकांशी प्रेमाने
पानं फुलं झुलतात
धुंद हवेशी जोमाने
वाटे दव मी की व्हावे
कधी कलिका फुलेही
बंद काळजाची कळी
अलगदसी खुलेही
रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२४/०५/२०२४
रात्री १०.२२ वा.
11:27
1 Unread Message
बंद काळजाची कळी अलगदसी खुलेही
वा किती सुंदर रचना!🌹 🙏 सुप्रभात
11:28
Message



## (१८)
## तुझीच संगिनी साथी प्रिया

मंद्र गुलाबी हळव्या सुखांची
फुले रेशमी देशील का
तशाच हळव्या हृदयपाकळ्या
माझ्या संगे नेशील का

आजमाव तू सख्या कधीही
भावसुमन परिमळलेले
स्वर्गसूख हे नक्की कोणते
सहवासी मज कळलेले


घेशील अलगद बाहुंमध्ये
विरघळून मी जाताना
अधर बंद हे शिवले कोणी
मूकपणे ते गाताना

एक सांगते ऐक प्रिया तुज
कवळे सुकोमल जपणे भाव
कोमलांगी मी तन्वी मोहिनी
साजूक नाजूक माझा गाव

त्या गावातील राजहंस तू
तुज चोचीतले मोती चार
रिझवून देईन सदा खुशीने
दुःख झळा ना सुख हे अपार

ओंजळीत तू भरशील मजला
इतुकी मी सुकुमार प्रिया
अधीर मनाची तरीही धीराची
तुझीच संगिनी साथी प्रिया

दि. ३०/०५/२०२४
रात्री ०९.५३ वा.



22:34
Anirudhha Kavishwar
online
कवळे सुकोमल जपणे भाव
कोमलांगी मी तन्वी मोहिनी
साजूक नाजूक माझा गाव

त्या गावातील राजहंस तू
तुज चोचीतले मोती चार
रिझवून देईन सदा खुशीने
दु:ख झळा ना सुख हे अपार

ओंजळीत तू भरशील मजला
इतुकी मी सुकुमार प्रिया
अधीर मनाची तरीही धीराची
तुझीच संगिनी साथी प्रिया

रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि ३०/०५/२०२४
रात्री ०९.५३ वा.
22:05
" अधीर मनाची तरीही धीराची "
काय म्हणावं तुमच्या कवी कल्पनेला परस्पर विरोधी तरीही चपखल शब्दयोजना !!

ज्यांना समजली ते भाग्यवान आणि ज्याला सुचली त्याच्या तीव्र बुध्दी, भावनाशील व्यक्तीमत्वाला मनोमन प्रणाम 🙏
22:33
Message



## (१९)
## दिव्य गुणांची मोजमिती

कुठून कधी बघ वयात येता
दाढी मिशी कवळी उगवे
पुरुषपणाच्या खुणा रांगड्या
अंगावर मदन हा निपजे

एक एक ते उभरून जातील
तनुवर भावही नकळतसे
किशोर अल्लड बालवयातील
उडे फुलपाखरू न कळतसे

यौवन आले उंबऱ्यात हे
पुढे सळसळता धबधबा
येण्याआधीच तारुण्याचा
कसा हवासा हा दबदबा

शिव शक्तीच्या मीलनातले
रम्य बोलके पुरुष नि स्त्री
घडवीत जातो परमेश्वर त्या
जन्म नवे नूतन चक्री

त्या कायेचा करुनी आदर
राखणे शरीर हे मंदिर की
रोमरोमी वसलेल्या त्याची
कृतार्थतेने पूजा ही

जे जे दिधले अवयव उत्तम
अगणित त्याचे ते उपकार
सन्मानाने त्याच्या कृतीला
सद्गुण सौंदर्यालंकार


असेल स्त्री की पुरुष सामोरी
त्याची अलौकिक ती निर्मिती
परस्परांच्या देहापेक्षा
दिव्य गुणांची मोजमिती


आदरभावे पुरुषपणाचे
किंचित वरचढ का गुणगान
लुभवीत त्याला घेई सावरून
जननी भगिनी संगिनी मान

रूप वेगळे आत्मरूप ते
दोघांचेही एकसमान
पुरुष बळाचा महामेरू तर
स्त्री कोमल वात्सल्या खाण

पूरक उभये परस्परांना
साचे खाचे सांधुनिया
अगणित जीवां रेशीमबंधनी
साक्षी वर तो बांधुनिया

दि.३१/०५/२०२४
सकाळी ०७.४८ वा.





## (२०)
## शापित शशीचे चक्र उदास

चंद्र म्हणाला नकोच आता
विरही नभातून एकटे राती
जरा कळ्या मी होऊन जावे
गंध घेऊनी फुलेही साथी

उगाच वेड्या चांदण्यातली
दिशाहीन का भासे भ्रमंती
उद्यानातील फुलाफुलांची
परिमळलेली गोड संगती


लुकलूक करतील लक्ष चांदण्या
तरीही दूर त्या गावी राहतील
कळ्या फुलांच्या कोषांमध्ये
दडवून सुरभी दिव्या पाहतील

इथे अमावस अर्ध मास मी
झुरतो उरतो काहीच ना
तिथे फुलांचे उत्सव फुलण्या
मुहूर्त कसले नाहीच ना

ऋतू कसे मी इथून पाहणे
तिथे ओथंबुन भिजणारे
इथे प्रियेच्या आठवणीने
डोळे माझे थिजणारे

म्हणून वाटते नको आताशी
शापित शशीचे चक्र उदास
रोज नव्याने उमलून यावे
कळ्या फुलांचे मोहक हास

दि.०२/०६/२०२४
सकाळी ०८.०४ वा.


10:08
Anirudhha Kulkarni
इथे प्रियेच्या आठवणीने
डोळे माझे थिजणारे
म्हणून वाटते नको आताशी
शापित शशीचे चक्र उदास
रोज नव्याने उमलून यावे
कळ्या फुलांचे मोहक हास
रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.०२/०६/२०२४
सकाळी ०८.०४ वा.
08:36
व्वाह!!
चंद्राच्या भावछटांचे उत्कृष्ट वर्णन...
लक्षावधी चांदण्यांच्या अन तारकांच्या
सानिध्यात असतानाही सहस्त्रादि कोस
दूर असलेल्या या पृथ्वीतलावरच्या मोहक
फुलांच्या विविध अनुभवांचे आकर्षण आणि
ते अनुभव घेण्यासाठी चंद्राची आतुरता
हे सारे एका प्रियकराच्या मनामधल्या
अधीरतेला शब्दबद्ध करत आहे!!!
केवळ अप्रतिम 👌👌
09:06
Message



## (२१)
## घे नमन हृदयांकिते

परम सौभाग्यदायिनी
पार्वती परमेश्वरी
परमसुंदरी वीरश्री
अर्ध नारी नटेश्वरी

जगत्पालनी तू जननी
सृष्टी पालनपोषिनी
शंकर नंदिनी अर्धांगिनी
गजानन कार्तिक तोषिनी

मुखमयी आभा मोहिनी
त्रिभुवन माते स्वामिनी
भक्तकृपाळू वत्सले
रागिणी अनुरागिणी

अन्नपूर्णे महादेवी
शांकरी अभयंकरी
उदयाचली तेजावली
अंबे रक्ताम्बरधरी

सकलदुःख गे हारिणी
सुरसुरां आधारिणी
असुरमद संहारिणी
अखिल विश्वा तारिणी

शक्ती भुक्ती मुक्तीरूपा
वंदिता अभिवंदिता
घे नमन हृदयांकिते
नंदिता अभिनंदिता

दि.०४/०६/२०२४
सकाळी ०८.०४ वा.


08:37
Stay Connected HBD Sanja...
+91 90280 17745, +91 90290 30818, +9...
सकलदु:ख गे हारिणी
सुरसुरां आधारिणी
असुरमद संहारिणी
अखिल विश्वा तारिणी

शक्ती भुक्ती मुक्तीरूपा
वंदिता अभिवंदिता
घे नमन हृदयांकिते
नंदिता अभिनंदिता

रचना©डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.०४/०६/२०२४
सकाळी ०८.०४ वा.
08:08
1 Unread Message
~ Vinod Kulkarni
+91 82753 88326
You
घे नमन हृदयांकिते
परम सौभाग्यदायिनी...
व्वा व्वा, माता पार्वती देवीचे अतिशय सुंदर वर्णन.
शब्दांची चपखलता आणि गेयता दोन्ही साध्य झालय.
🙏🙏
08:36
Message



## (२२)
## पुन्हा मीच वेडी नवी जन्मते का

असे कोणते गाव माझे म्हणावे
इथे सारे क्षणभर जगाया मिळावे
जरी वाटे सारे हे माझेच आहे
मला ही हळुच ते सहज आकळावे

तरीही पुन्हा मी इथे ओघळावी
प्राजक्त बकुळी अबोलीच व्हावी
जे मूळ सारे मी सोडून देता
सुरभी नवी देत नवेलीच व्हावी


इथे सृष्टी सारी नव्यानेच खुलते
कळी कोंब पाने ही वेलीही डुलते
मग मी अशी का उदासी पहावी
माझ्यावरी मी नव्यानेच भुलते

सकाळी नवी एक आशा पहावी
पुन्हा सांजेला केशराने नहावी
क्षणाला क्षणाची स्मृती देखणी ही
जन्मांतरी ही गहनशी रहावी

इथे आत माझ्या कुणी राहते का
मनाने मनाला हळूच वाहते का
तलम भावना त्या जपुनी कोंदणात
पुन्हा मीच वेडी नवी जन्मते का

दि.१८/०६/२०२४
सकाळी ०६.५७ वा.


07:44
4G R
Dr londhe mama,par...
जन्मांतरी हा गहनशा रहावा
इथे आत माझ्या कुणी राहते का
मनाने मनाला हळूच वाहते का
तलम भावना त्या जपुनी कोंदणात
पुन्हा मीच वेडी नवी जन्मते का
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.१८/०६/२०२४
सकाळी ०६.५७ वा.
07:34
You
पुन्हा मीच वेडी नवी जन्मते का
असे कोणते गाव माझे म्हणावे...
छानच, आवडलं,
कांही ओळींनी कुसुमाग्रजांची स्मृती दिली .
07:37
धन्यवाद मामा
07:39
कोणत्या ओळी
Edited 07:40
तीसरं कडवं एकटं वाचलं तर पृथ्वीच्या प्रेम गीतात सामावून गेलं असतं .
07:42
🙏😊
07:43
Message



## (२३)
## किती जगावे कैसे

सडा सांडला प्राजक्ताचा
हळव्या प्रभातवेळी
गंधकोश उघडले कोवळे
नाजुक केशरखेळी


इतकी अलगद कशी कोसळती
शब्द न ओठी येती
मूकपणे का बोलत जाती
स्मृती गाठीशी घेती

जेथून येती जन्माला मग
त्या पदतळी नमताना
जीवन करुनी अर्पित जाती
सुखे खुशी गमताना

काय मनी ते असेल त्यांच्या
किती जगावे कैसे
गंधासाठी जग वेडावून
आस उरावी तैसे

जगणे फुलणे गळणे उमलणे
वेचणे ओघळताना
तसेच हासू वाटून द्यावे
आसू नयनी गळताना

दि.१९/०६/२०२४
सकाळी ०७.३४ वा.


10:09
ACP-100
Charulata Kale Parle Mumbai,avinash Dh...
तसेच हासू वाटून द्यावे
आसू नयनी गळताना
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.१९/०६/२०२४
सकाळी ०७.३४ वा.
08:17
Charulata Kale Parle Mumbai,avi...
वा मंजुषा!!!!
सहज, सुन्दर, अर्थपूर्ण
09:20
धन्यवाद ताई
09:55
Dr. Laxmikant Dani Acp100 दे ब्रा
You
किती जगावे कैसे
सडा सांडला प्राजक्ताचा...
Extremely beautiful, joyful, graceful, and meaningful with a natural flow.
Heartiest Congratulations Dr Manjusha Tai
10:07
मन:पूर्वक धन्यवाद लक्ष्मीकांत जी
10:08
Message



## (२४)
## तू सांग कृष्णराजा

हातात हात घेऊन
या चांदण्यात न्हाऊन
तू सांग कृष्णराजा
डोळ्यात माझ्या पाहून

आहे खरेच का ते
तुज प्रेम माझ्यावरती
आहेस तू नभाचा
आणि खरे मी धरती

उमलून पुष्पलतिका
पाहतात दृश्य आपुले
त्या ऐकण्यास उत्सुक
हे प्रेमगीत आपुले


आले मी सारे सोडून
मी कृष्ण वेडी झाले
वेडात दौडदौडत
यमुनाकिनारी आले

तू सांग सत्य सखया
तू फक्त आहे माझा
आता हे श्वास झाले
नावे तुझ्याच राजा

राधा कशास जगते
ती ऐसी का हो वागे
राहील का हे प्रेम
युग युगांती आपुले जागे

माझ्यात तूच भरला
श्वासात तूच उरला
शोधू कुठे तुला रे
तू आत माझ्या बाहेरी कोठे नूरला

दि.१७/०५/२०२५
रात्री १२.५८ वा.


11:03
Anirudhha Kavishwar
माझ्यात तूच भरला
श्वासात तूच उरला
शोधू कुठे तुला रे
तू आत माझ्या बाहेरी कोठे नूरला
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.१७/०५/२०२५
रात्री १२.५८ वा.
20:41
1 unread message
Today
"शिरते कुशीत माझ्या
निजले जरा जराशी
दिसते नवेच स्वप्न
आता मला उराशी"
स्वतः ची संगत ज्याला आवडते तो जीवनात यशस्वी होतो. आत्मभान ज्याला आले त्यांची प्रतिभा स्वतः बरोबर इतरांना ही ते भान आणण्याची क्षमता राखून असते.
आपण अशा व्यक्ती आहात ज्यांनी स्वतः ला अंतर्बाह्य ओळखले आहे. 🙏🏻🙏🏻🌹
07:32
Message



## (२५)
## फुलास प्रीती देती

तू दिलेला सोनचाफा की
प्रीत बोलकी वाटे
प्रियेस देशी गंध सुगंधी
रीत नव्याने दाटे


तिने मांडियली सुबक रांगोळी
प्रेम तियेचे ओतून
कुसुम मनाची असती प्रतीके
प्रेम झरे स्वर्गातून

ईश्वरी संकेतांची मीलने
वसुंधरेवर घडती
अंबर धरणी प्रीत फुलूनी
सडे फुलांचे पडती

कुणी रसिक ते येती आणिक
पुष्प वेचुनी घेती
भाव मनातील आरोपून त्या
फुलास प्रीती देती

या काळजाची त्या काळजातून
तार छेडली जाते
हळूच कोकिळगाण सुरातील
कुठूनसे ऐकू येते

दि.१४/०७/२०२४
सकाळी ०६.४१ वा.


10:15
Anirudhha Kulkarni
कुणी रसिक ते येती आणिक
पुष्प वेचुनी घेती
भाव मनातील आरोपून त्या
फुलास प्रीती देती
या काळजाची त्या काळजातून
तार छेडली जाते
हळूच कोकिळगाण सुरातील
कुठूनसे ऐकू येते
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.१४/०७/२०२४
सकाळी ०६.४१ वा.
06:44
1 Unread Message
आजची कविता अफलातून छान आहे.
निसर्गाची लीला किती सुंदर मांडली आहेस.
आणि अखेरीस व्यक्त केलेली कृतज्ञतेची
भावना तर परमोच्च बिंदू 👌👌
तुझ्यामध्ये वास करणाऱ्या सरस्वतीला वंदन
🙏🙏
10:07
Message



## (२६)
## भीज पावसाची

भीज पावसाची शीतल शहाऱ्याची
धुंद राहण्याची ही संगती अशी
गाभुळला ऋतू जाई उतू उतू
भावनांची हुतुतू संमती कशी


धुरव्यात धुकं काळजाचं ठोकं
बधिरलं अंग अंग दंग होत बसं
नजरेत लाज तिचा दाटलाय साज
कोपऱ्यात डोळ्याच्या अलवार हसं

छत्रीत एका, बिलगून एकमेका
तुझ्या माझ्या भावनांचा, उंच उंच झोका
जरा जरा थांब, जाऊ दोघे लांब लांब
बरसात प्रीतधारा, मधुरसा मोका

दिनरात हवा, आशा पाखरांचा थवा
बेहोशीचा नवा, रंग सांग सख्या मला
काय तू बोलावे, काय मी सांगावे
शब्देवीण गूज माझे, कळावे की तुला

ऋतू पांघरावा, थंड तुषार फवारा
अत्तराचा फाया, उडे मातीतून सारा
टवटवी फुलवीत, आली नाचत उडत
बावरून गेली की ही वर्षाव धारा

दि.२७/०७/२०२४
सकाळी ०८.२१ वा.


09:16 02:16
Stay Connected
Dr.Suhas Bhakre Stay Connected is typin...
जरा जरा थांब ,जाऊ दोघे लांब लांब
बरसात प्रीतधारा,मधुरसा मोका

दिनरात हवा, आशा पाखरांचा थवा
बेहोशीचा नवा, रंग सांग सख्या मला
काय तू बोलावे ,काय मी सांगावे
शब्देवीण गूज माझे, कळावे की तुला

ऋतू पांघरावा ,थंड तुषार फवारा
अत्तराचा फाया,उडे मातीतून सारा
टवटवी फुलवीत ,आली नाचत उडत
बावरून गेली की ही वर्षाव धारा

रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२७/०७/२०२४
सकाळी ०८.२१ वा.
09:02
3 unread messages
~ Vishram
+91 98701 43360
You
भीज पावसाची
भीज पावसाची शीतल शहाऱ्याची...
वाह, किती हळुवार व्यक्त केलं आहे.
फारच सुरेख 🌹🌹
09:15
Message



## (२७)
## आता नव्याने भातुकलीची

इवली इवली भातुकली अन्?
इवले इवले सारे
इवल्या इवल्या हातांवरती
जग इवलेसे न्यारे

चूल इवलुशी न पेटवता
ऊब केवढी देते
वरण भात पोळी भाजी
सारे शिजवून देते

पाटावरती प्रेम बसवुनी
माया खाऊ घाले
घासामधले घास भरवता
लळा जिव्हाळा चाले

बालपणीचे असे सोहळे
डोळे माझे ओले
खऱ्या संसारी डोकावून ती
भातुकली मज बोले

तसेच राहो निरागसाचे
जगणे सुंदर राणी
राजा खोटा घरकुल खोटे
खरी प्रीतीची गाणी

ऐक सांगते पुन्हा मांड तू
भातुकलीची कहाणी
नकोच आणूस अवखळ डोळा
पुन्हा कधीही पाणी

हसली भांडी हसला खेळही
हसला तो थाट माट
आता नव्याने भातुकलीची
पुन्हा चालते वाट
मधुरशी पुन्हा चालते वाट

दि.०८/०८/२०२४
सकाळी ०७.३८ वा.


22:40
नभरंग कलेचे व्यासपीठ
+91 77220 06924, +91 84110 38484, +9...
पुन्हा चालते वाट
मधुरशी पुन्हा चालते वाट
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.०८/०८/२०२४
सकाळी ०७.३८ वा.
22:04
~ Swanand +91 89757 57391
You
आता नव्याने भातुकलीची
इवली इवली भातुकली अन्...
Waah!! Far sundar 22:07
22:10
~ Purushottam Ing... +91 98506 64393
You
आता नव्याने भातुकलीची
इवली इवली भातुकली अन्...
मंजुषाजी अप्रतिम लिहीता हो तुम्ही .
खूप आनंद मिळतो वाचताना. 22:39
धन्यवाद सरजी 22:39
Message



## (२८)
## भरले केळीचे पान

श्रावण सुरू झाला की
नैवेद्याची लगबग
सुग्रास अन्नाचे सुवास
भरले केळीचे पान बघ

लवण चवीचे लिंब फोड
लोणचं चटण्या ओल्या सुक्या
कोशिंबिरी भरड डाळी
पातळभाज्या फोडभाज्या

पापड कुरकुर कुर्वडया
चमचमीत भजे भरडा
पुरी भाजी सातळ उसळ
कढी आमटी डाळवडा

खीर बासुंदी करंजी बुंदी
साखरभाताची गोडी
लाडू वाढू पुरणपोळी
रवाळ तुपाची तिज जोडी


वरण भात साजुक तूप
मसाले भात रोचक खूप
दहीभात शेवटी घ्या
खुलून येईल आपलेच रूप

धूप दीप ओवाळून घ्या
नैवेद्य देवांसी द्या
पोटभर मग पोटपूजा
यथेच्छ ते ते खाऊन घ्या

शेवटी तांबूल मुखशुद्धी
गोविंदविडा ठेवा तबकी
गप्पाटप्पा चालू द्या
एक मधुरशी मग डुलकी

दि.०९/०८/२०२४
रात्री ११.३९ वा.


14:49
मनमंदिर..
Shashank Mhasawade, +91 74480 8045...
13:15
~ Pradnya +91 96045 57689
~ Shrikrishna Kulk... +91 98814 91804
खूप छान रचना केली डॉ.मंजूषा कुलकर्णी
माझा मो.हँग झाल्याने ही रचना डिलिट झाली...
13:57
1 unread message
~ Anita Vyavahare +91 88883 53652
You
भरले केळीचे पान
श्रावण सुरू झाला की...
ताई.... येथेच्छ चविष्ट... नैवद्य....
..
काव्यात्मक जेवण थाळी अप्रतिम
आला आला श्रावण
अन्नपूर्णेन बनवलं सुग्रास जेवण
नैवद्यासाठी भरलं केळीचे पान
मंजुषा ताई आमची सुगरण महान
14:48
Message



## (२९)
## मोरपीस

कधी कधी मनावर भावनेच्या
कुंचल्याचे मोरपीस फिरते ना
हळुवार मनास भावलेला श्याम
त्याच्या आठवणीत राधाही उरते ना

किती आणि कशा बरं पुसाव्यात
मनाच्या कोंदणातील स्मृतींच्या घुंगुरमाळा
त्यांना पुन्हा पुन्हा वर येत आठवांचे
डोंगर उभे करण्याचाच चाळा

नको तरी कसे म्हणावे की त्या
इतक्या हळुवार अलवार फिरतात
मनाच्या तळाशी खोल खोल कुठेतरी
कधीही न विसरण्यासाठीच उरतात

एकदा ठरवले अजिबात आठवायचे नाही
मनाला आता कधीही त्या जुन्या
साम्राज्यात पाठवायचे नाही
हळूच मनाने म्हटले, 'काय मी आता
मला भावले तेही साठवायचे नाही?'


असे नको करुस ना म्हणत
मनाने मनानेच दडवून ठेवलेले मोरपीस
फिरवले
मी पुन्हा त्या स्मृतींच्या खेळात
सरलेल्या काळाला गिरवले

दि.१५/०८/२०२४
सकाळी ०६.५७ वा.


07:05
Rajendra Bhalerao M...
साम्राज्यात पाठवायचे नाही
हळूच मनाने म्हटले," काय
मी आता मला भावले तेही साठवायचे
नाही?"

असे नको करुस ना म्हणत
मनाने मनानेच दडवून ठेवलेले
मोरपीस फिरवले
मी पुन्हा त्या स्मृतींच्या खेळात
सरलेल्या काळाला गिरवले

रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.१५/०८/२०२४
सकाळी ,०६.५७ वा.
06:59
You
देव भेटता जन्म सार्थकी
मनास माझ्या सदाच वाटे...
त्याच्या हाताचा स्पर्श तुमच्या पर्यंत
पोहचतो म्हणून च तुमच्या द्वारे ही त्याचीच
अभिव्यक्ती होती.तुमचे हे पवित्र भाव
नक्कीच त्याच्या हाताची जाणीव तुम्हाला
करत राहील
06:59
धन्यवाद
07:05
Message



## (३०)
## चिंब ओल्या वाटेवरती

चिंब ओल्या वाटेवरती
मोती सांडलेले
बघ दवाचे थेंब चम
पल्लवीशी मांडलेले

स्पर्श ओले ओलीत्याचे
मेण वाटे मृत्तिका
गप्प होती जी उधाणली
काळजातून वृत्ती का


झाडे वेली डोलताना
थंड झुळुका वाहती
त्या गवतपात्या लाजुनी
प्रीतरंगी नाहती

डोकावून पाहे सविता
पावसाच्या अंगणी
इंद्रधनूच्या वाकलेल्या
त्या कमानी रंगणी

आज येतो गंध कोठून
मंद धुंद सारखा
त्या फुलांना त्या भुईला
होवो ना कधी पारखा

दि.२२/०८/२०२४
रात्री ११.४८ वा.


17:08
मनमंदिर..
Shashank Mhasawade, +91 74480 8045...
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२२/०८/२०२४
रात्री ११.४८ वा.
11:24
4
~ BHARTI +91 98236 90528
12:00
Your security code with ~ Supriya changed. Tap to learn more.
4 unread messages
~ Manik Mahajan +91 79726 13330
This message was deleted 15:00
You
चिंब ओल्या वाटेवरती
चिंब ओल्या वाटेवरती...
आपल्या चित्रकाव्य रचना खुप सुंदर असतात ताई,अगदी अभ्यासासाठी संदर्भ ठेवण्या सारख्या अप्रतिम साहीत्य लेखन
15:03
Akshata Manmandir Group
Akshata Manmandir Group
मी शहर आणि किस्से 5
Message




## (३१)
## बरवा श्रावण जन्मला

मोद भरला आसमंती
तो बरसला उन्मला
मास मधु येऊन जाता
बरवा श्रावण जन्मला

फिरती मधुकर पुंजिका
वनराणीच्या अंचला
पुष्पिकांना उमलविण्या
बरवा श्रावण जन्मला

पालवीच्या तोरणाला
कोंब वेडा दंगला
रंग हिरवे ओतण्याला
बरवा श्रावण जन्मला

ऊन पाऊस पाठशिवणी
इंद्रधनुचा कुंचला
चित्र देखणे रेखण्याला
बरवा श्रावण जन्मला

नभ धरेच्या भेटण्याची
आस वाढते चंचला
मीलनाच्या सोहळ्यातून
बरवा श्रावण जन्मला

दि.२३/०८/२०२४
सकाळी ०९.३१ वा.


20:02
21:49
मनमंदिर..
Shashank Mhasawade, +91 74480 8045...
~ Manik Mahajan
+91 79726 13330
~ BHARTI
+91 98236 90528
ऋतूरंग
इन्द्रधनूचे रंग उधळूनी
असा देखणा निसर्ग नट...
किती सुंदर चित्रकाव्य रचना👌👌
🙏
19:08
You
बरवा श्रावण जन्मला
मोद भरला आसमंती...
नभ धरेच्या भेटण्याची
आस वाढते चंचला....
वा वा अप्रतिम👌👌
19:10
~ Snehal Deshpande
+91 99220 80193
You
चिंब ओल्या वाटेवरती
चिंब ओल्या वाटेवरती...
खुप छान 👌😊
19:19
Akshata Manmandir Group
You
बरवा श्रावण जन्मला
Message



## (३२)
## भरलेल्या मेघांची तोरणे

असा पाऊस मोहरून यावा
आयुष्याचा उत्सव व्हावा
थेंब कळ्या सुखाच्या बरसता
दाह पोळता विझून जावा

त्याची वाट किती मी पहावी
जीव कलिका सुकू न द्यावी
आस चातकी उरात राखत
सर अंगावरी ती झेलावी

स्पर्श शीतल गारवे धुंद
स्वप्नं उमलू पाहते मंद
मज हरीचा जडतो छंद
तीरी यमुनेच्या कृष्णगंध


आता जावे कुठे नि कशाला
वर्षा प्रीतीची हृदयी बंद
सारे करता समर्पणाला
अंतःकरणी आनंद कंद


अस्सा पाऊस दवाचा दूत
थेंब मोतीयाचे ओंजळीत
जरा थांबला दडून वेडा
हास हासत कवळ्या कळीत

फुले पावसाची वेचताना
मन ओलावून परिमळे
आठवांच्या नदीला भरते
वर शांत मनी खळखळे

एक पाऊस आत राहतो
कधी कोसळतो कधी नाही
भरलेल्या मेघांची तोरणे
थेंबपाऊस दाराशी काही

दि.२९/०८/२०२४
सकाळी ०७.४९ वा.


13:32
Anirudhha Kavishwar
online
कधी कोसळतो कधी नाही
भरलेल्या मेघांची तोरणे
थेंबपाऊस दाराशी काही
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२९/०८/२०२४
सकाळी ०७.४९ वा.
17:44
You
भरलेल्या मेघांची तोरणे
असा पाऊस मोहरून यावा...
खूप सुंदर , मनाला साद घालणारी कविता .
" थेंब मोतियाचे ओंजळीत "
" फुले पावसाची वेचताना "
भावनांना शब्दफुलोर्यानी सजवणे आणि लोभस पणे हळुवार हाती सोपवणे हे तुमच्या कवितांचे वैशिष्ट्य. निसर्गाशी एकरुप होऊन भान हरपणे , स्वतः मधेच आनंदानी मनाचे बहरणे हे सारे अवलोकितेश्र्वराचे देणे.
शेअर केल्याबद्दल धन्यवाद 🙏🌹
Edited 18:49
Message



## (३३)
## मंजुवेणु स्वरबंध

मी तुझ्यात समरस तू माझ्यातून
श्रीरंगा मनभावना
देह आगळे ह्रदय एकरूप
कुणीच घेईल ठाव ना


मिटुनी लोचना रूप देखता
आत वेगळा श्याम मिळे
राधेसंगे एकरूप जो
कृष्ण सावळा धाम मिळे

हाती बासरी सुरांच्या सरी
ओढ ही कसली वरचेवरी
जन्म कोणते आदी अनादी
मीलन कसले हे भूवरी

श्वासांमधल्या लयीत आणि
गंधामधल्या गंधी तू
तुजविण नाही अन्य गोडी मज
छंदांमधल्या छंदी तू

ही प्रीतीची रीत कोणती
कसले हे अनुबंध
ऐकू येईल युगायुगातून
मंजुवेणु स्वरबंध

दि.०५/०९/२०२४
सकाळी ०९.१२ वा.


21:53
फक्त कविता
Amruta Khakurdikar Brahman...
You
मंजुवेणु स्वरबंध
मी तुझ्यात समरस तू माझ्या...
ताई, आपलं दोघींचं नाव आहे बांधलेलं यात🥰
18:58
~ Dr(Prof).Geeta Ra... +91 94230 39593
You
मंजुवेणु स्वरबंध
मी तुझ्यात समरस तू माझ्या...
👌💐
19:04
🙏
19:05
1 unread message
~ Nitin +91 70209 55485
You
मंजुवेणु स्वरबंध
मी तुझ्यात समरस तू माझ्या...
दंडवत 🙏🙏
21:51
Message



## (३४)
## पार्वतीचा बाळ मी

अंगापेक्षा बोंगा माझा मोऽऽऽदक मोठ्ठा
शक्तिमान आहे समजू नका मला छोट्टा

पार्वतीचा बाळ मी लाडका गणेशा
म्हणतात देव सारे आदी गुणेशा

उंदरावर स्वारी माझी भराभरा फिरे
आईसाठी पृथ्वीही कमी मोल उरे


विघ्नांचा उडवतो अस्सा मी धुव्वा
संकट नाशक आहे गणु बुवा

पाहताच मोदकाला राहवत नाही
खाण्यासाठी धरेवर दहा दिस राही

केशराच्या सुगंधात खोबऱ्याचा कीस
मोदकाविना हो माझा जीव कासावीस

आलो आहे करा माझे लाड कोड खूप
गोडधोड देता देईन सुख मी अनूप

दि.०८/०९/२०२४
सकाळी ०९.४९ वा.


23:02
Aruna Kajarekar Stay...
खाण्यासाठी धरेवर दहा दिस राही
केशराच्या सुगंधात खोबऱ्याचा कीस
मोदकाविना हो माझा जीव कासावीस
आलो आहे करा माझे लाड कोड खूप
गोडधोड देता देईन सुख मी अनूप
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.०८/०९/२०२४
सकाळी ०९.४९ वा.
22:29
Madam
तुमच्या सर्वच कविता अप्रतिम असतात.
पण ही छोट्या गणुची कविता खूपच भावली.
तुमच्या परवानगीने मी ही कविता इतरांना शेअर करू शकते कां ?
22:31
नक्की
नावासह नक्की पुढाळायला काहीही हरकत नाही
मन:पूर्वक धन्यवाद🙏🏻
23:02
Message



## (३५)
## तशीच तुझी नि माझी प्रीती

शब्दप्रभू जरी तुला मी वाटे
प्रीतीमध्ये शब्द थांबती
भाव भावना आपसूक उमटून
शब्दकुसरी का खरे लांबती



नकळत मिटती लोचने दोन्ही
लज्जा तेथे प्रकटुन जाते
स्पर्श तुझे मज तनुशी होता
काया रोमांचित हो रहाते

केशही पुलकित रोम रोम मज
तुला समर्पित होऊन जातो
काय मनाचे पुसशी प्रियवरा
कणकण प्रेमाने गीत गातो

श्वास चालती लयीत तुझिया
मिसळून जाती श्वासांमध्ये
ध्यास वेगळे नुरती न माझे
मिसळून जाती ध्यासांमध्ये

जशी राधिका वेणुनादे
जन्मोजन्मी उरली आहे
तशीच तुझी नि माझी प्रीती
ईश्कृपेने स्फुरली आहे

दि.२०/०९/२०२४
सकाळी ०७.५५ वा.


07:29
vijaya Wad Nishigandh...
केशही पुलकित रोम रोम मज
तुला समर्पित होऊन जातो
काय मनाचे पुसशी प्रियवरा
कणकण प्रेमाने गीत गातो
श्वास चालती लयीत तुझिया
मिसळून जाती श्वासांमध्ये
ध्यास वेगळे नुरती न माझे
मिसळून जाती ध्यासांमध्ये
जशी राधिका वेणुनादे
जन्मोजन्मी उरली आहे
तशीच तुझी नि माझी प्रीती
ईश्कृपेने स्फुरली आहे
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२०/०९/२०२४
सकाळी ०७.५५ वा.
16:19
Today
Sarvach कविता छान आहेत g राणी .मी खूप खूश आहे
01:26
धन्यवाद माझी माय🙏
07:29
Message

16:26
Alka dalalbhawji
online
काय मनाचे पुसशी प्रियवरा
कणकण प्रेमाने गीत गातो
श्वास चालती लयीत तुझिया
मिसळून जाती श्वासांमध्ये
ध्यास वेगळे नुरती न माझे
मिसळून जाती ध्यासांमध्ये
जशी राधिका वेणुनादे
जन्मोजन्मी उरली आहे
तशीच तुझी नि माझी प्रीती
ईश्कृपेने स्फुरली आहे
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२०/०९/२०२४
सकाळी ०७.५५ वा.
16:19
👌👌
कल्पनांची पुनरावृत्ती सुद्धा होत नाही गं.....
प्रत्येक कविता नवी!!
जेवढा मोठा हा काव्ययज्ञ मांडला आहेस तू......
धन्य!!!!
🙏🙏🙏🙏🙏😊
16:25
Message



## (३६)
## निसर्गातली रम्य दिवाळी

कुणी उजळले दीप त्या तिथे
झाली दिपवाळी
सजून गेली भिजून गेली
प्रकाशात आळी


झाडांवरती उतरून आल्या
सुमनांच्या चांदण्या
जणू आगळी पहा दिवाळी
उमलून हे सांगण्या

आकाशातील कंदील सारे
फांद्यांवर लटकले
रस्त्यांवरती सडे रेशमी
तेजाचे टाकले

स्नेह दिव्यांची माळ ओवली
लक्ष्मीसाठी कुणी
येईल चालत पूजेसाठी
तयारीस पाहुनी

निसर्गातली रम्य दिवाळी
दीप उजळता धरा
अशी खुलावी जणू फुलावी
अलगद वसुंधरा

दि.२७/१०/२०२४
रात्री १२.३२ वा.


17:45
Ujjawala Pawar Dadar...
जणू आगळी पहा दिवाळी
उमलून हे सांगण्या

आकाशातील कंदील सारे
फांद्यांवर लटकले
रस्त्यांवरती सडे रेशमी
तेजाचे टाकले

स्नेह दिव्यांची माळ ओवली
लक्ष्मीसाठी कुणी
येईल चालत पूजेसाठी
तयारीस पाहुनी

निसर्गातली रम्य दिवाळी
दीप उजळता धरा
अशी खुलावी जणू फुलावी
अलगद वसुंधरा

रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२७/१०/२०२४
रात्री १२.३२ वा.
13:03
1 unread message
निसर्गातली रम्य दिवाळी ....कल्पनाच किती छान आहे. व्वा!
16:50
Message



## (३७)
## भाऊबीज ओवाळीते

मुक्ताई नि ज्ञानेशाची
आज किती सय आली
भावा बहिणीच्या नात्याला
गोड जरतार झाली

तिची त्याच्यावर माया
त्याची काळजी सखोल
कसे नाते नि जिव्हाळा
बंध प्रेम अनमोल


तुझे माझे की जमेना
तुझ्याविना करमेना
नाते गोड हे अतूट
मन कुठेच रमेना

भळभळत्या जखमेला
सांधे द्रौपदीचा शेला
कृष्ण मायेसाठी पहा
तिच्या दारी की हो गेला

बालपणीच्या स्मृतींनी
गर्दी मनाच्या अंगणी
स्नेह जगावेगळा येई
सुवास चंदनी

भाऊबीज ओवाळीते
तुला भाऊराया
सदा राहू दे तुझी
माझ्या पाठीशी रे माया

दि.०३/१०/२०२४
सकाळी ०९.३५ वा.


10:34
Rameshchandra Kulka...
online
भळभळत्या जखमेला सांधे द्रौपदीचा शेला
कृष्ण मायेसाठी पहा तिच्या दारी की हो गेला

बालपणीच्या स्मृतींनी गर्दी मनाच्या अंगणी
स्नेह जगावेगळा येई सुवास चंदनी

भाऊबीज ओवाळीते तुला भाऊराया
सदा राहू दे तुझी माझ्या पाठीशी रे माया

रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.०३/१०/२०२४
सकाळी ०९.३५ वा.
09:39
प्राचीन इतिहासाशी नाते जोडत प्रत्येकाच्या बालपणीच्या भाऊबीज सोहळ्या पर्यंतचे भाऊ बहिणीच्या प्रेमाचे गहिरे अनुबंध सुंदर तेने व खूप भाव विभो र तेने उलगडून दाखवले आहेत ते खूप अप्रतिम मन स्पर्शी आहेत खूप खूप धन्यवाद सुप्रभात
10:33
🙏
10:34
Message



## (३८)
## सांगा दिव्यास कोणी

सांगा दिव्यास कोणी
वेडे झुरायचे ना
खाणाखुणा मनीच्या
ठेवत उरायचे ना

वण राहतील स्नेहल
जेथे तुम्ही जळाले
मिटवू शके न कोणी
इतके मुरायचे ना


आता तरी शिकावे
जगणे नवे स्वतःचे
कोणासही हवे ते
तैसे स्फुरयचे ना


अंधारलेल्या राती
तेजास घेत हाती
वातीस आणि ज्योतीस
इतके चुरायचे ना

बघता जमेल का हो
उजळून आत येणे
दारात की उरातून
इतके नुरायचे ना

सांगा दिव्यास कोणी...

दि.३०/१०/२०२४
सायं. ०५.४० वा.


10:46
Rameshchandra Kulka...
तेजास घेत हाती
वातीस आणि ज्योतीस
इतके चुरायचे ना
बघता जमेल का हो
उजळून आत येणे
दारात की उरातून
इतके नुरायचे ना
सांगा दिव्यास कोणी.....
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.३०/१०/२०२४
सायं ०५.४० वा.
17:59
Today
ही गझल आहे की कविता काहीही असो
पण खूप छान व सुंदर दिवाळीच्या फराळ
पेक्षाही गोड रोज असा फराळ पाठवत रहा
दीपावली पर्व आनंदी होऊन भरून राहील
शुभ दीपावली
09:05
धन्यवाद काका
आपले आशीर्वाद असेच असू द्या 🙏🕉️
10:46
Message



## (३९)
## जगणे खरे असावे

आता कुणास सांगा
भेटावयास जावे
प्रत्येक माणसाने
आपुल्याच कोषी रहावे

दुःखास वाट मिळणे
आता कठीण आहे
दुःखास आत दाबून
जगणे दिखाऊ आहे

गेले दिवस ते गेले
गप्पा नि भेटी होती
आले मनी ते बोलू
मनमोकळीच नाती

आता उगाच आखून
का घेतल्यात सीमा
ही बंधने फुकाची
जगण्याचा मार्ग धीमा


हसणे न असते आतून
खळखळ झरे ते आटले
जगण्यात राम नाही
ते बेगडीच वाटले

एकाकीपण उदासी
आतून घेरलेली
माया जिव्हाळा गेला
पोतेरी फेरलेली

जगणे खरे असावे
हसणे तसेच ओठी
आपुलकी वसावी
आभाळाएवढी पोटी

शब्दात जोडण्याचा
मधु गोडवा दिसावा
चेहरा खराखुरा हो
पारदर्शी हसावा

दि.०९/११/२०२४
सकाळी ०८.४३ वा.





## (४०)
## ऐक बा विठ्ठला

ऐक बा विठ्ठला
जीव कासावीस झाला
डोळे वाटेला लावून
माथा तुझ्या चरणाला


पाप पुण्य ना माहीत
मला तुझा एक ठाव
देवा समजून घे रे
माझा भोळा भक्तीभाव


चंद्रभागेच्या जळाशी
जशी शीतलता राहें
माझ्या मनात तुझ्याच
आधाराची नदी वाहे

बाप जगताचा तूच
माय रखुमाई संग
तुझ्या गाभाऱ्यात जीव
मन गजरात दंग

आज संपली ती नीज
तुला जाग आता आली
देवा तुझी माझी भेट
उपवासी गोड झाली

दि.१२/११/२०२४
रात्री १०.०५ वा.


23:01
अभिजात मराठी बाणा ... फक्त मराठी
Ashwini, +91 79725 77132, +91 88888...
माय रखुमाई संग
तुझ्या गाभाऱ्यात जीव
मन गजरात दंग
आज संपली ती नीज
तुला जाग आता आली
देवा तुझी माझी भेट
उपवासी गोड झाली
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.१२/११/२०२४
रात्री १०.०५ वा.
22:11
~ Diksha Deepak Ek... +91 94223 03284
You
ऐक बा विठ्ठला
ऐक बा विठ्ठला...
तुमच्यातील अलौकिक प्रतिभेला वंदन
22:22
22:22
23:01
Message



## (४१)
## असे वाटते जन्म वहावा

किंचित उघडे मुख सुंदरसे
शब्द लाघवी देतील
क्षणात मजला तुझ्या हृदयी गे
सखे साजने नेतील
आणिक बुडवून सखये देतील...

ओष्ठ पाकळ्या मोहक कलिका
रंग त्यावरी चढला
त्या नाजुकशा रेखा उभटशा
चित्ती कोलाहल जो उठला
माझ्या चित्ती कोलाहल जो उठला...

आतून डोकावून पाहती
आखीव रेखीव दशन
रंग शुभ्र पांढरा तयांचा
कसे सांभाळावे मन
चंचल वेडे हे मन.

करतो  त्यावर कहर केवढा
अवखळ हनुवरी तीळ
तनमन सारे प्रियानुरागे
कण कण ऊऽऽतावीळ
चित्ता पडतो माझ्या पीळ...

सुंदर  रेखीव सरळ नासिका
जणु कळी चाफ्याची
एक चांदणी रुळू दे नथनी
कला कुसर उफ्? त्याची
तू तर कला कुसर ग त्याची.


असे वाटते जन्म वहावा
केवळ तुज निरखण्या
एक नजर तुझी पडू दे इकडे
उभारी येईल जगण्या
राणी आवश्यक मी तगण्या....

दि.१७/०१/२०२३
सकाळी ०८.५६ वा.

आता माझे काही ना खरे
नयन शराबी तेजल
राजीवलोचन तू अभिमोहन
बुबुळे केवढे सेजल
पाणीदार सुंदरसे नेत्र,
इवले इवले सरोवर...

दृष्टी जादूगरीच करते
खिळवून ठेवते मजला
घट्ट दाटसर कज्जल रेषा
जणू बंधने मजला
कोंडून घेईन त्यातच स्वतः...

अन्? भुवयांच्या उंच कमानी
डौलदार धनुषाच्या
पुन्हा चंद्र तो होऊन कुंकुम
भाळी उगवे उषा त्या
वेचून हास्याच्या कळ्या...
अस्ताव्यस्त बटाही रुळती
सुंदरतेच्या वर्धक
लावण्यच हे अद्वितीय तव
प्रिये कोणी ना स्पर्धक
धडधड ही संवर्धक ....



## (४२)
## हे वेडाचे वेडूऽऽ कोडे

वेड्या नाजूक वळणावरती
वेडेपण ये भरामधे
वेड्या भेटी होऊन काही
वेड्या स्मृतींच्या घरामधे

वेडून वेड्या वेडभावना
वेडावून येतात पुन्हा
वेडाच्याच भरातून घडतो
प्रीतीचा वेडात गुन्हा

वेड्या वेड्या घिरट्या घालून
वेडी पक्षीण भरवे पिल्ला
वेड्या धीरा उरात वीरा
राखून नेती गड किल्ला

वेड्या क्रांतीतून निपजली
वेडी बेडी तोडकृती
वेड चांगले जडता संस्कृती
वेड वेडता हो विकृती

वेड्या वात्सल्याच्या गावी
वेडी माया माय वेडी
वेड्या वाटेवरी गावची
मनात वसते ओढ वेडी

हे वेडेपण आंदण व्हावे
द्यावे घ्यावे थोडे थोडे
वेडावरती सोडून द्यावे
हे वेडाचे वेडूऽऽ कोडे

दि.१८/११/२०२४
सकाळी ०८.२९ वा.


11:29
मनमंदिर..
Shashank Mhasawade, +91 74480 8045...
मनाच्या वेडावर सुंदर काव्य रचना.
मलाही सुचेल तसे लिहिण्याचे वेड
लागले आहे.
सुनीता मावशी.
11:20
11:23
1 unread message
~ Manik Sonnis
+91 79726 13330
You
हे वेडाचे वेडूss कोडे
वेड्या नाजूक वळणावर...
हे वेडेपण आनंद व्हावे
घ्यावे घ्यावे थोडे थोडे
वेडावरती सोडून द्यावे
हे वेडाचे वेडूऽऽकोडे...
तुम्ही शब्दप्रभूच आहात ताई,
फारच छान
खर तर ध्येयवेडीच माणसच काही तरी
नविन इतिहास घडवितात हे त्रिकालीन
सत्य आहे
11:24
Message

## (४३)
## वळण असावे वळणावळणावरती

वळणावरती थांबायाची
वेळ कधीतरी येते
जरा विसावा हलका हलका
जीवन घेऊन जाते

कधी कुणाची वाट पाहता
थकून डोळे जाती
कधी आपुले कुणी भेटता
हासू गीतही गाती


कधी कुणाचे चुकले काही
म्हणून शिक्षा कोणा
कधी निवृत्ती घेऊन मनही
मागते भिक्षा कोणा

सरळ वाटते चाले जीवन
तैसे कैसे घडणे
एक अनामिक वळण अनोखे
वाटेवरती पडणे

तिथे वळावे की सांभाळावे
स्वतःस एकट्याने
प्रवास वाटे सुखकर होईल
होता तो दुकट्याने

म्हणून वाटते वळण असावे
वळणावळणावरती
जरा वळावे काही कळावे
मनास यावी भरती

दि.१०/१२/२०२४
रात्री १०.४३ वा.


21:01
Prasanna Kondo Tulja...
एक अनामिक वळण अनोखे
वाटेवरती पडणे

तिथे वळावे की सांभाळावे
स्वत:स एकट्याने
प्रवास वाटे सुखकर होईल
होता तो दुकट्याने

म्हणून वाटते वळण असावे
वळणावळणावरती
जरा वळावे काही कळावे
मनास यावी भरती

रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.१०/१२/२०२४
रात्री १०.४३ वा.
19:35
1 unread message
You
वळण असावे वळणावळणावरती
वळणावरती थांबायाची...
गदिमांच्या ,
घननिळा लडिवाळा
ची आठवण आली.
19:48
Message



## (४४)
## नखशिखांत साजामध्ये

बघ नटले मी सजले आहे
प्रिया तुझ्यासाठी
वाट पाहणे जीवघेणे बघ
ठरेल माझ्यासाठी

शृंगारातून उजळून गेले
लावण्य हे माझे
आभूषणे अन साज हे सारे
अंगावर साजे

पातळ सजवून देते काया
अंबाड्यातून गजरा
तुझ्या स्वागता उभी इथे मी
मुखडा माझा हसरा


हिरव्या चुड्याची किणकिण गोडी
खेचत तुजला आणील
पायातील मज पैंजण घुंगरू
प्रीत तुझी बघ जाणील

नथ मुरडते नाकी माझ्या
कुंकूम भाळी खुलते
कानी झुबे अन कर्णवेल ही
मन सजनाचे भुलते

हळूच येशील चाहूल देशील
मिठीत मिटवून घेशील
क्षणात राजा मला वेगळ्या
जगात आपुल्या नेशील

मग तू राजस पघळून जाशील
विलीन माझ्यामध्ये
खुणा प्रीतीच्या सोड मुलायम
नखशिखांत साजामध्ये

दि.०७/११/२०२४
रात्री १०.५० वा.





## (४५)
## बीज अंकुरे अंकुरे

बीज अंकुरे अंकुरे
आस उभरून येता
आत भुईच्या कुशीत
रोप तरारून जाता


काय सांगते ती माती
जप बाळा नातीगोती
पानं फुलं कळ्या शाखा
भार कधीही ना होती

होत जाईल विस्तार
मुळं माझ्याशी जोडली
जर असतील सदा
कुणी कितीही तोडली

पुन्हा होईन मी माता
संजीवन स्तन्य देता
पुन्हा पुन्हा नवनवी
संतती की जन्म घेता

आत खोल रुजलेले
धागे स्नेह भरलेले
बंध घट्ट अंतरीचे
शब्दातीत ठरलेले


दि.१२/१२/२०२४
सकाळी ०९.३८ वा.


21:53
ACP-100
Charulata Kale Parle Mumbai,avinash Dh...
मुळं माझ्याशी जोडली
जर असतील सदा
कुणी कितीही तोडली

पुन्हा होईन मी माता
संजीवन स्तन्य देता
पुन्हा पुन्हा नवनवी
संतती की जन्म घेता

आत खोल रुजलेले
धागे स्नेह भरलेले
बंध घट्ट अंतरीचे
शब्दातीत ठरलेले

रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.१२/१२/२०२४
सकाळी ०९.३८ वा.
21:23
Charulata Kale Parle Mumbai,avi...
You
बीज अंकुरे अंकुरे
बीज अंकुरे अंकुरे...
डॉ. मंजुषा कमालीचे सुन्दर शब्द!
21:50
Message



## (४६)
## प्रिया वधू मी सख्या तुझी रे

प्रिया वधू मी सख्या तुझी रे
नटले सजले आहे
दर्पणी पाहते रूप निखरले
लज्जेत मी भिजले आहे


तुला पाहते गाली हसते
मनात लाडिक आस
आता तुझ्या नावाने येतील
जातील माझे श्वास

शालू खुलला मेंदी रंगली
गजरा फुलला आहे
साजन माझा प्रीत बावरा
मजवर भुलला आहे

नजरेमध्ये किती स्वप्नांची
माळ ओवली आहे
वाट प्रिया तू दे ना फुलांची
सजनी कोवळी आहे

तुझ्यासवे मी सुख भरलेले
चित्र पाहते आहे
गुंग सदा मी दंग प्रिया रे
तव रंगी राहते आहे

दि.१५/१२/२०२४
रात्री ११.२३ वा.


11:18
Sandhya Purandare Br...
माळ ओवली आहे
वाट प्रिया तू दे ना फुलांची
सजनी कोवळी आहे

तुझ्यासवे मी सुख भरलेले
चित्र पाहते आहे
गुंग सदा मी दंग प्रिया रे
तव रंगी राहते आहे

रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.१५/१२/२०२४
रात्री ११.२३ वा.
10:55
ही माझी मामे बहीण
हिचे लग्न 15 dec la झाले
तुझी आज ची कविता आमच्या फॅमिली
group var पाठवली
सर्वांना अतिशय अतिशय आवडलं
सगळ्यानी तुझ्या कविता चे खूप खूप
कौतुक केले आहे
10:58
जान्हवी आणि मानस
वधू वर याना पण avadali
10:59
अरे वा
धन्यवाद सखी
11:18
Message



## (४७)
## जळ अवखळ लाटांच्या नागिणी

जपून जपून जपून टाक पावला
जीव सखे तुझ्यामधे गुंतला
काय भरवसा अथांग सागरा
धीर मज मनीचा प्रिये संपला


ती घसरडी वाट जप जरा ग तू
तेथ निसटती झणी जाण तू
खडक चिकचिके सारे जाहले
घट्ट पाय रोवुनी ग थांब तू


जळ अवखळ लाटांच्या नागिणी
सळसळ करुनी निघतील धावुनी
येतील सरसर सर सरसावुनी
घे अंदाजा नीट पाहुनी

तूऽऽ ओली चिंब चिंब जाहली
मोहिशी तू मज मना ग भिजलेली
अजूनही तिथेच आहे थांबलो
दृष्टी ही कधीऽऽचीच थबकली

पण वाटे काळजी तू धुंद ग
फुलपाखरू तैसी स्वच्छंद ग
ओढ लावी मजसी तव सुगंध ग
कोशी तुझ्या प्रीतीचा मी बंद ग

दि.१९/१२/२०२४
रात्री ११.२६ वा.


12:07
Anirudhha Kavishwar
रांजणात डोकावीत
पाहिलेली रूपसी
आरशाची ना तमा नि
आस भरली खूपसी
दे पुन्हा दे मला
तो काळ देवा परतुनी
गेला आहे आजही जो
हातातूनी हरवुनी
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.२०/१२/२०२४
सकाळी ०९.०९.वा.
09:16
You
जळ अवखळ लाटांच्या नागिणी
जपून जपून जपून टाक पावला...
किती सुंदर रित्या व्यक्त होता . सरस्वतीचा वरदहस्त आहे तो तसाच रहावा आणि मन सदैव प्रफुल्लित असावे ही ईश्वरचरणी प्रार्थना 🙏 🌹
11:02
🕉️ 🙏
12:07
Message


08:24
Sanjivani Gole Dombiv...
online
जळ अवखळ लाटांच्या नागिणी
सळसळ करुनी निघतील धावुनी
येतील सरसर सर सरसावुनी
घे अंदाजा नीट पाहुनी
तूऽऽ ओली चिंब चिंब जाहली
मोहिशी तू मज मना ग भिजलेली
अजूनही तिथेच आहे थांबलो
दृष्टी ही कधीऽऽचीच थबकली
पण वाटे काळजी तू धुंद ग
फुलपाखरू तैसी स्वच्छंद ग
ओढ लावी मजसी तव सुगंध ग
कोशी तुझ्या प्रीतीचा मी बंद ग
रचना©®डॉ.मंजूषा कुलकर्णी
दि.१९/१२/२०२४
रात्री ११.२६ वा.
23:28
Today
सुप्रभात.
किती वेगवेगळ्या विषयांवर कविता करता तुम्ही.
दोन्ही रचना आवडल्या.
06:26
Message

# लेखिकेचा परिचय

- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

२३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

ई-मेल : dr.manjushak@gmail.com

मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४

**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

**''साहित्यिक व्रत''** म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग (अन्य रसिक प्रतिक्रिया) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, (निसर्गपर) - युगंधरा, (वेळा) - तेव्हा, (मिश्र कविता) - गंधराणी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, नभ मोजताना, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (अन्य रसिक प्रतिक्रिया) - रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (फुले) - कामिनी, (रंग) - रंगतनु, कृष्णकांत, (सर्वोत्कृष्ट कविता) - कविता माझी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२-२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_ medium =social& utm_ campaign=socialshare buttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/@maha_governor 1439559856764030979?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com//lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/?utmsource=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>533350529198id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम –<br>''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ<br>अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of<br>100th Episode of<br>Mann Ki Baat from<br>Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ८५
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : १८
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●